## 59व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेचे इतिवृत्त (दि. 27 मार्च 2021)

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय संविधानाचे जनकपरमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय अणुऊर्जा आस्थापनाचे जनक डॉ. होमी जहांगीर भाभा यांना विनम्र अभिवादन करून मी संस्थेचा मानद सचिव संजय गावंडे आजच्या 59 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ऑनलाइन उपस्थित असलेले सर्वसभासद सन्माननीय भागधारक, संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष माननीय वजरेकर साहेबयांचे संचालक मंडळाच्या वतीने स्वागत करीत आहे. संस्थेची 59 वी वार्षिकसर्वसाधारण सभा सुरू होण्यापूर्वी या आर्थिक वर्षात मृत झालेल्या सभासदांना आदरांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे उभे राहावे. धन्यवाद. 59 व्यावार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष माननीय वजरेकर साहेब यांना विनंती करतोकी त्यांनी आपले मनोगत व्यक्त करावे.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-सर्वप्रथम मी सर्व सभासद, सर्वभागधारकांचे संस्थेच्या 59 व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेमध्ये सहर्षस्वागत करत आहे.संस्थेची स्थापना होऊन आज साठाव्या वर्षात आपण पदार्पणकेलेले आहे. विशेष म्हणजे वेगळे वैशिष्ट्य घेऊन आपण या सभेस सामोरे जात आहोत. गेल्या वर्षात आपण covid-19 सारख्या भयावह महामारीच्या संकटातून गेलो आहोत. आजही करोनाचे संकट आपल्या समोर आ वासून उभे आहे. प्राप्तपरिस्थितीतून जाताना आपल्या जीवनशैलीमध्ये अनेक बदल आपण स्वीकारले आहेत. त्यामुळे पारंपारिक एकत्र समूहाने जमून होणारी सर्वसाधारण सभा आज व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमातून आपल्याला घ्यावी लागत आहे. हा बदल देखील आपण सहजपणे स्वीकाराल. तसेच आजची ही सर्वसाधारण सभा आपल्याला एक वेगळा अनुभवदेईल अशी मी आशा व्यक्त करतो आणि ही ऐतिहासिक सभा व्यवस्थित पार पाडण्यातआपण सहकार्य कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो व खात्री बाळगतो. आज अतिशय आनंदहोत आहे आपल्या जिव्हाळयाने संस्थेच्या साठाव्या वर्षात पदार्पण करीत आहोत.जवळजवळ रूपये 644 कोटींचा वार्षिक उलाढालीचा टप्पा आपण पार केलेला आहे ते आपल्यासर्वांच्या सहकार्याने. संस्थेची दमदार वाटचाल सर्वांसाठी स्थैर्य निर्माणकरणारी आहे. सहकाराच्या वाटेवरील खऱ्या अर्थाने समृद्धीच्या पाऊलखुणा आहेतम्हणून संस्थेचे ब्रीदवाक्य सहकारणे समृद्धि भवतु हे सार्थ ठरत आहे.ही प्रचंड मोठी मजल आहे, फार मोठा प्रवास आहे, निश्चितच या सहकाराच्या वटवृक्षाच्या छायेखाली सर्व सभासदांच्या गरजांचे संवर्धन आणि संरक्षणप्राप्त होईल. या 60 वर्षात सहकाराची जाणीव असलेले सर्व आजी माजी संचालकतसेच अनेक सभासद यांनी वेळोवेळी या सर्वसाधारण सभेस संबोधित करून संस्थेस व संचालक मंडळास मार्गदर्शन व योग्य दिशा दिलेली आहे. मात्र या आजच्या सभेस काही मर्यादा आहेत. आधुनिक युगातील तंत्रज्ञानाचा आधार घेत आपल्याला सभेचे कामकाजचालवावे लागेल. त्यामुळे आपल्या सर्वांना संयमित असणे गरजेचे आहे, जेणेकरूनपहिल्यांदाच अशा या ऑनलाईन होणाऱ्या सभेमध्ये सभेचा प्लॅटफॉर्म हासर्वांसाठी फायदेशीर ठरून सभेचे कामकाज पार पडण्यास मदतहोईल. COVID-19 चा काळ सर्वांसाठी अतिशय वाईट आणि त्रासदायक झाला आहे.तसाच तो जीवन जगण्यासाठी नवी दिशा देऊन जात आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये आपणसर्वांनी स्वतःची, कुटुंबाची अतिशय चांगल्या प्रकारे काळजी घेतलेली असेल,अजूनही स्थिती फारशी चांगली नाही. स्वतःची आणि कुटुंबाची जबाबदारीने काळजीघ्या, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित रहा. या दरम्यान या गोष्टींचा अवलंब

करावासा वाटतो कारण संचालक मंडळाने करोना विषाणूच्या लॉकडाऊनच्या काळात सुद्धा सभासदांची सेवा अविरतपणे सुरू ठेवली. तसेच सभासदांच्या हिताचे आणि फायद्याचे निर्णय घेऊन अडचणीच्या काळात त्यांना आर्थिक उणीव भासू दिली नाही. याबद्दल सर्व सभासदांचे आणि कार्यकारी मंडळाचे अभिनंदन आणि धन्यवाद. सभेचे कामकाज चालवण्यासाठी मी संस्थेचे सेक्रेटरी यांना विनंती करतो की त्यांनी अध्यक्षांना बोलण्याची विनंती करावी.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- संस्थेचे चेअरमन माननीय श्री मडगांवकर साहेबांना मी विनंती करतो की त्यांनी आपले मनोगत व्यक्त करावे.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- महाराष्ट्राचे आराध्यदैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बीएआरसी आस्थापनाचे जनक डॉ. होमी जहांगीरभाभा यांना विनम्र अभिवादन करून आजच्या या 59 व्या वार्षिक सर्वसाधारणऑनलाइन सभेत उपस्थित असलेले संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आदरणीय अंनत वजरेकर साहेब, लवकरच सामील होणारे संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष आदरणीय श्रीरामसाहेब, संस्थेच्या उपाध्यक्षा श्रीमती तृप्ती मुखर्जी, संस्थेचे मानद सचिव श्रीसंजय गावंडे, सहसचिव श्री एस आर सोनी, उपस्थित सर्व संचालक, सभासद बंधुभगिनींनो आणि माऊलींनो, संस्थेच्या इतिहासामध्ये सर्वप्रथम होणाऱ्या ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभेस चेअरमन म्हणून संबोधित करण्याचा सन्मान मला मिळत आहे याचा मला अत्यानंद होत आहे. मागच्या वर्षी माझ्या काही हितचिंतकांनी उपहासात्मक टिपणी केली होती की तुमची ही शेवटची वार्षिक सर्वसाधारण सभा आहे. निश्चितच मी तेही आनंदाने स्वीकारले. परंतु आज या संस्थेचे हिरक महोत्सवी वर्ष आहे. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये माझी काहीही चूक नसताना मला माझ्या सहकाऱ्यांनी माझ्यावर अविश्वासाचा ठराव सादर करून माझी चेअरमनशीप हिरावून घेतली. म्हणूनच आज संस्थेच्या हिरक महोत्सवी वर्षामध्ये या संस्थेचे चेअरमनपद भूषवण्याचा सन्मान मला मिळत आहे. मागील पाच वर्षांमध्ये या संस्थेस प्रगतीपथावर नेत असताना मला माझ्या जुन्या सहकाऱ्यांनी जो त्रास दिला त्याचे आपण सर्व सभासद साक्षीदार आहात. या संस्थेमध्ये असा एक समूह आहे की ज्यांना प्रत्येक चांगल्या गोष्टीत अडचण निर्माण करून या संस्थेची प्रगती थांबवायची आहे. सभासदांचे अकल्याण करायचे आहे. जसा पोपटाचा जीव त्याच्या कंठात असतो तसाच इथे काही समूहाचा जीव या आर्थिक संस्थेमध्ये आहे. त्याचे कारण मला समजू शकत नाही. मागील पाच वर्षांमध्ये या संस्थेचे काम करत असताना माझे अर्धे सहकारी आज म्हणत आहेत की मडगांवकर आम्हाला पुढची निवडणूक लढवायची नाही. वास्तविक मी त्यांना आग्रहाची विनंती करीत आहे की सभासदांसाठी ही निवडणूक लढवणे गरजेचे आहे. संस्थेची यावर्षी प्रथमच 'संकल्प सिद्धी' दिनदर्शिका प्रसिद्ध केली. त्याचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे कारण सभासदांना आवश्यक असलेली सर्व उपयुक्त माहिती त्यात आहे. त्यात दिलेली आकडेवारी पाहून सभासद म्हणत आहेत आकडेवारी तेच देऊ शकतात ज्यांचा कारभार पारदर्शक आहे. म्हणूनच माझे पदाधिकारी, संचालक मुकुंद भास्कर, सचिन उसरकर, उमेश गायकवाड, विवेक डोळस, विजय काकडे, अत्री, गजानन विसळ, निवृत्त संचालक संस्थेचे माजी चेअरमन जनार्दन पवार यांचा मला सार्थ अभिमान आहे. यावर्षी देखील वार्षिक

अहवालाचे मुखपृष्ठ मुकुंद भास्कर यांनी तयार केले आहे. या मुखपृष्ठावर त्यांनी दिपस्तंभ साकारला आहे. संस्थेच्या सभासदांच्या हितासाठी ज्या कामांची, निर्णयांची अंमलबजावणी केली त्याचा सारांश या मुखपृष्ठावर आहे. या संस्थेचा दिपस्तंभ महाराष्ट्रातील अनेक पतसंस्थांना दिशा दाखवल्याशिवाय राहणार नाही अशी आशा व्यक्त करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- सभा पुढे सुरू करण्यापूर्वी बरेचसे लोक वेटिंग आहेत. आपण आता अजेंडाच्या विषयाकडे वळणार आहोत. मी संस्थेचे मानद सचिव संजय गावंडे साहेबांना विनंती करत आहे की त्यांनी सभेचे कामकाज सुरू करावे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या अधिमंडळाच्या 59 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय सुरू करण्यापूर्वी वार्षिक अहवालामधील काही दुरुस्ती सांगायच्या आहेत त्यांची नोंद घ्यावी. ज्या प्रिंटींग मिस्टेक झालेल्या आहेत त्या मी सांगतो-1)विषय क्रमांक 3- फायनान्शिअल इयर 2020-21 असे वाचावे.2) पान क्रमांक 65-फ 1. 10 कर्ज विषयक धोरण-अ) मुदत कर्ज मर्यादा- साधारण कर्जमर्यादा हे इंग्रजीमध्ये बरोबर आहे परंतु मराठीमध्ये जमा भागभांडवल अधिक वर्गणी याच्या 16 पट किंवा मासिक वेतनाच्या 30 पट असे लिहिले आहे त्याऐवजी मराठीत जमा भाग भांडवल अधिकवर्गणी याच्या 4 पट किंवा मासिक वेतनाच्या 15 पट असे वाचावे. 3) पान क्रमांक 68- 6 नंबरवर मुदत कर्जाचा व्याजदर 9% इतका राहील असे लिहिले आहे, त्या ऐवजी कर्जाचा व्याजदर ठरवण्याचा अधिकार संचालक मंडळास असेल असे वाचावे. दुरुस्ती नोंदवून घेतल्यानंतर आपण सगळे विषय पत्रिकेला सुरुवात करत आहोत.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे यांनी विषय क्रमांक एक वाचून दाखवला.

**विषय क्रमांक 1:दि.19 ऑगस्ट 2019 रोजी झालेल्या 58व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- याबाबत 15 तारखेपासून इतिवृत्ताची प्रत संस्थेमध्ये ठेवली आहे तसेच वेबसाईटवर सुद्धा ही प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तर माझी विनंती आहे सभासदांना की त्यांनी याला मंजुरी द्यावी.

श्री आनंद गव्हाणकर- सर माझ्या मिसेसच्या नावाने लॉगिन आहे म्हणून त्यांचं नाव दिसत आहे. मी स्वतःमेंबर आहे. माझा आवाज येतो का तुम्हाला? धन्यवाद. संस्थेच्या पहिल्यांदाच होणाऱ्या या ऑनलाईन सभेमध्ये मला पहिले बोलण्याची परवानगी दिली हे माझं भाग्य आहे. त्याबद्दल मी धन्यवाद व्यक्त करतो.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- आपल्याकडे रेज हॅन्ड होतात, त्याप्रमाणे आपण प्रश्न घेतोय.

श्री आनंद गव्हाणकर- ठीक आहे सर. तुम्हाला धन्यवाद. सगळयात पहिल्यांदा मला सांगायचं आहे कि इतिवृत्तामध्ये पान क्रमांक 17 वर छापलेल आहे विषय क्रमांक 4 चर्चेला आलेला असताना त्यामध्ये चर्चा होऊ शकली नाही. सर्वांनी गोंधळ घातला. साहेब आम्ही गोंधळ घातला नव्हता. तुमच्या परवानगीने आम्ही विषय क्रमांक 4 चर्चेला घेतला आणि सर्वानुमते आणि बहुमताने तो फेटाळून लावला. सर्व सभासद याचे साक्षी आहेत. पूर्ण

संचालक मंडळ आणि तुम्ही स्टेजवर बसलेले होतात. असं कसं हे अहवालामध्ये छापू शकतात. बिल्डिंग फंडच्या युटिलायजेशनसाठी निसर्गरम्य ठिकाणी गेस्ट हाऊसबांधणे हे संचालक मंडळाच्या डोक्यात आहे.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- गव्हाणकर साहेब तुमचं म्हणणं बरोबर आहे पण सर्वानुमते जे ठरलं ते आपण स्वीकारलं आहे.

श्री आनंद गव्हाणकर- तुम्ही छापले चर्चा होऊ शकली नाही. पण चर्चा झाली या विषयावर. पूर्ण सभागृहामध्ये चर्चा झाली. दहा दहावेळेस आमचे ते सारंग म्हणून मेंबर होते त्यांनी विचारलं कोणाला पाहिजे आहे का निसर्गरम्य ठिकाणी गेस्ट हाऊस? तेव्हा सर्वांनी दोन दोन वेळा हात वर करून सांगितलं की आम्हाला गेस्टहाऊस नको आहे आणि आम्हाला हे कार्यालय नॉर्थगेटच्या बाहेर पण जाऊ द्यायचं नाही.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- गव्हाणकरजी सभासदांमध्ये गैरसमज पसरवू नका.

श्री आनंद गव्हाणकर- तुम्ही गैरसमज पसरवत आहात. मी कायद्याचं पालन करतोय. तुम्ही तुमचं वाक्य मागे घ्या. थांबा माझं बोलून होऊ द्या.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- तुम्ही जे म्हणताय ही संस्था बाहेर न्यायची आहे तर कोणत्याही संचालकांची इच्छा नाही, यापूर्वी जे संचालक झाले त्यांची सुद्धा इच्छा नव्हती की आपली संस्था गेटच्या बाहेर जाईल. म्हणून सभासदांसमोर गैरसमज पसरवू नका आणि राहिला प्रश्न विषयात जर बदल करायचा असेल तर अध्यक्षांच्या परवानगीने त्या विषयांना क्रमांक दिला जातो. सन्माननीय अनंत वजरेकर साहेबांनी या प्रकारे कुठल्याही प्रकारची सूचना दिली नव्हती की विषय क्रमांक 4हा पहिल्या क्रमांकावर येईल. जर तसं असेल तर ते मिनिट्स मध्ये रेकॉर्ड झालं असतं. आणि तुम्ही पदसिद्ध अध्यक्ष वजरेकर साहेब यांच्यावर एलिगेशन करत आहात की त्यांनी परवानगी दिली आणि हा विषय सर्वप्रथम घेतला.

श्री आनंद गव्हाणकर- ते आम्ही बघू. माझीअजून पंधरा वर्ष सर्विस बाकी आहे.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-गव्हाणकर साहेब आपल्या प्रश्नाचं समाधान झालं असेल आणि सर्वात मोठी गोष्ट होती म्हणजे आपल्या सर्वांच्या बहुमताने जो काही प्रस्ताव होता तो सर्वानुमते सर्वसाधारण सभेत मागे घेतला. मला वाटतं याच्यावर आपण थोडं समाधान मानावं व आणि वेळेच्या अभावी आपण पुढे जाण्यास काही हरकत नाही.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- विषय क्र. १ला याला सूचक आणि अनुमोदक द्यावे अशी मी विनंती करतो.

श्री शिवाजी हगवणे- अध्यक्ष साहेब मला थोडं बोलायचं आहे. तुमचे अभिनंदन करायचेआहे. आता तुम्ही सांगितलं की जो विषय क्रमांक 4 होता तो सभासदांमध्ये चर्चेला गेला आणि तो मागे घेतला गेला पण या प्रोसिडिंगमध्ये असं छापलं आहे की काही सभासदांनी गोंधळ घालून यावर चर्चा होऊ दिली नाही. मडगांवकर साहेब, यावर चर्चा झालेली आहे. खरं तर हा विषय चर्चा होऊन हाऊसने तो रद्द केलेला आहे, हे मला तुमच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. तुम्ही सभासदांची, हाऊसची दिशाभूल करत आहात. मला वजरेकरसाहेबांचे अभिनंदन

करायचेआहे कारण खरं तर साहेबांनी विषय सांगितला की त्यावर चर्चा होऊन तो विषयमागे घेतला गेला, मग संचालक मंडळाला हा विषय अजूनही जिवंत ठेवायचा आहे का. कारण यामध्ये त्यांनी असं छापलं आहे की सदर विषयावर चर्चा होऊ शकली नाही.पण सदर विषयावर चर्चा झाली, मतदान झालं आणि हाऊसने हा विषय फेटाळला आहे. म्हणून तुम्ही हाऊसची आणि सभासदांची दिशाभूल करू नका साहेब. मगाशी मडगांवकर साहेब तुम्ही बोललात, मीच होतो तो सभासद ज्याने सांगितलं होतं कीही तुमची शेवटची सभा असेल. साहेब 'कोरोना कालखंड' या अपरिहार्य कारणामुळे तुम्हाला या सभेचे अध्यक्षपद भूषवता आलेले आहे. करोनाचा कालखंड नसता तर ती तुमची शेवटची सभा असती याबद्दल काही वादच नाही. चांगल्या गोष्टी मांडण्याचा आम्हाला अधिकार नाही का. आम्ही बोलू शकत नाही का. त्या पद्धतीने आमच्या काही गोष्टी असतील त्या मांडायच्या असतील तर आम्ही सभासदांच्या विरोधी हे तुम्ही एका साईडने केलं. बरं झालं मला एक विषय आठवला कि या आभासी सभेचा मान तुम्हाला पहिला मिळाला. त्याच पद्धतीने तुम्ही मला सुवर्णसंधी या सभेच्या निमित्ताने दिलेली आहे. मगाशी आपण भाषण करताना महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ.होमी जहांगीर भाभा यांचे पुण्यस्मरण करून या सभेच्या भाषणाला सुरुवात केली या ठिकाणी मला तुम्हाला प्रश्न विचारायचा आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- विषय क्रमांक 1चालू आहे.

श्री शिवाजी हगवणे- मला बोलु द्या साहेब.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-अजून पर्यंत मला वाटतं 385 मेम्बर्सचे रेज हॅन्ड आहेत. म्हणून मला वाटतं आपण थोडक्यात विषय मांडू शकता.आता आपण पूर्णविराम देऊया या विषयाला. आपल्यापैकी कोणीतरी सूचक आणि अनुमोदक द्यावे आणि विषय क्रमांक 1 संपवावा आणि पुढे जे काही महत्त्वाचे विषय आहेत त्याच्याकडे वळूया.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- माझी सभासदांनाविनंती आहे की विषय क्रमांक 1 ला सूचक आणि अनुमोदक द्यावे.

चर्चेअंती विषय क्र.1 पास करण्यात आला. त्यानुसार ठराव पास करण्यात आला

**ठराव क्र.1: ठराव पास करण्यात आला की दि.19 ऑगस्ट 2019 रोजी झालेल्या 58व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सभागृहाने सर्वानुमते मंजूर केले.**

सूचक - श्री अजित सातोसे, एच.डब्ल्यू.बी.

अनुमोदक- श्री सुरेश शिरोळे, डब्ल्यू आय पी

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

श्री अजीत सातोसे- मागच्या सभेमध्ये आपली या विषयावर चर्चा झालेली होती आणि बऱ्याच जणांनी याला संमती दिली होती की इन्कम टॅक्समध्ये कराच्या रूपात जो पैसा भरत आहोत, भरणार आहोत तो पैसा कुठेतरी चांगल्या ठिकाणी वापरता येईल असं मडगांवकर साहेबानी मांडलं होतं.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- बरोबर. पण आज हा विषय अजेंडावर नाही.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- आपल्या सभेमध्ये संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम एस., चीफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर आलेले आहेत. त्यांचे मी स्वागत करतो आणि सभेमध्ये ते आता सहभागी होतील.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- मी संस्थेच्या वतीने आपल्या संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम साहेब उपस्थित झाले आहेत. त्यांचे संचालक मंडळातर्फे स्वागत करतो आणि आता पुढील विषय क्रमांक दोन चर्चेला घेतो. सचिवांनी विषय क्रमांक 2 वाचून दाखवला.

**विषय क्रमांक 2:1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2020 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय वैधानिक लेखापरीक्षित ताळेबंद, नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मंजुरी देणे.**

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-या विषयाबद्दल कोणाचे काहीप्रश्न आले होते का?

मानद सचिव श्री संजय गावंडे- नाही विषय क्रमांक 2 वर कोणाचे काही प्रश्न आले नाहीत. आणि ऐनवेळी येणारे काही प्रश्न असतील तर ते घेऊ.पान क्रमांक 42 ते 47 पान क्रमांक 42 ते 45 वर लेखा परीक्षित ताळेबंदआहे आणि पान क्रमांक 46, 47 वर प्रॉफिट अँड लॉस अकाउंट दिलेला आहे. त्याबाबत मी सभासदांना विनंती करतो की त्यांनी सूचक आणि अनुमोदक या विषयास द्यावेत.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- या विषयावर कोणीही अगोदर प्रश्न विचारले नाहीत, पण कोणाला प्रश्न विचारायचे असतील तर आपल्यासमोर आता हा अजेंडा मांडला आहे तर त्यावर दोन चार प्रश्न घेऊ या.

श्री सुनील खाकसे- साहेब एकेकप्रश्न घेऊ या. सॉरी इंटरप्ट यु. एकेक प्रश्नासाठी 300- 300 सभासद हात वरतीकरत आहेत. आणि दोन किंवा एक जण घेतात. प्लीज सर.

श्री विलास घोरपडे- पान क्रमांक 44 वर LEGAL EXPENSES दिले आहे 28 लाख 97 हजार 810. तर आपण दर वेळी एवढे पेजेसचा अहवाल छापतो, परंतु हा जो कायदेशीर खर्च आहे तो कोण कोणत्या संदर्भात आहे, कुठे कुठे झाला आणि कोणत्या केसेस आहेत याविषयी या पत्रकामध्ये कुठेही छापाई झालेली नाही. माझी एवढीच विनंती आहे साहेब येथून पुढे आपले जे कायदेशीर खर्च असतील त्याबद्दल सविस्तर माहिती यामध्ये देण्यात यावी.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- सूचना मान्य आहे.

श्री विलास घोरपडे- कारण दरवर्षी हा लीगल खर्च डबल होत चालला आहे. माझ्या मते गेल्यावर्षी हा खर्च 15लाखांच्या आसपास होता आणि आत्ता 28 लाख आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- याचा पूर्ण खर्च आहे 12 लाख 74 हजार 950 आणि या बाबतीत सांगायचं तर आपल्या ज्या इन्कम टॅक्स केसेस चालू आहेत 2012- 13 मध्ये जे इन्कम टॅक्सबाबत प्रकरण करून ठेवल आहे आणि त्यामुळे आपली केस स्क्रुटीनी मध्येगेली. त्यामुळेच प्रत्येक वर्षी आपली केस स्क्रुटीनीमध्ये जात आहे आणित्यासाठी आपल्याला LEGAL EXPENSES, PROFESSIONAL EXPENSES करावे लागत आहेत. आपले जे इंटरनल टॅक्स ऑडिटर, इन्कम टॅक्स ॲडव्हायझर आहेत सी.ए.,दोशी त्यांच्याकडे आपल्या बऱ्याच केसेस आहेत. काही केसेस आपल्या हायकोर्टामध्ये आहेत, काही इन्कम टॅक्स मध्ये आहेत, काही सीआयटी मध्ये आहेत त्याचा खर्च आहे. तसेच याबाबतीत सांगायचं म्हणजे आपले जे सभासद संचालकहोते अरुण कोळी यांनी

त्यांची जी कास्ट आहे त्या कास्टमध्ये निवडणूक न लढवता दुसऱ्या वर्गामध्ये निवडणूक लढवली आणि भारतीय राज्यघटनेचा अपमान केला. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध आम्हाला कोर्टात जावे लागले. जर त्यांनी असं केलं नसतं तर हे LEGAL EXPENSES झाले नसते आणि या बाबतीत त्या संचालकांची चूक आहे आणि अरुण कोळी यांच्यावर CONTEMPT OF COURT सुद्धा सिद्ध झालेला आहे. ही जी केस आम्ही लढवली त्याबाबतीत कोर्टानेसुद्धा contempt केले आहे की अरुण कोळी यामध्ये दोषी आहेत म्हणून.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-आपल्या पुढच्या सभासदाला संधी देऊया.

श्री डी एस राजापुरे- हे बॅलन्सशीट मध्ये छापले की धनसंकल्प लखपती डिपॉझिट पान क्रमांक 42 वर 3 कोटी 89 लाख 92 हजार यामध्ये तुम्ही इंटरेस्ट आहे की विदाऊट इंटरेस्ट आहे ही रक्कम, हा पार्ट दिलेला नाही.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- विदाऊट इंटरेस्ट आहे.

श्री डी एस राजापुरे- जर हा पार्ट विदाऊट इंटरेस्ट आहे तर ती स्कीम माझ्या माहितीनुसार 2500 पर मंथ आहे. जर तुम्ही 2500 डिवाइड केलं तर ती राउंड फिगर मध्ये येत नाही मग ते असं कसं. ती फिगर 2500 काढली आहे तर रक्कम पण राउंड फिगर मध्ये हवी आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- काही सभासदांनी त्या स्कीममधून विथड्रॉ केल्यामुळे ती फिगर तशी आलेली आहे.

श्री डी एस राजापुरे- गावंडे साहेब तुमचे म्हणणे मला मान्य आहे. पण जरकोणी विथड्रॉ केले तर ते 2500 च्या पटी मध्ये होणार ना.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- त्यामध्ये त्यांचा इंटरेस्ट पण गेला आहे.

श्री डी एस राजापुरे- मी प्रश्न विचारला होता की या स्कीम मध्ये ही रक्कम विथ इंटरेस्ट आहे की विदाऊट आहे तुम्ही आधीच सांगितलं की विदाऊट इंटरेस्ट आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- जे सभासद आहेत त्यांची फक्त प्रिन्सिपल रक्कम आहे आणि जे सभासद विथड्रॉ करूनगेले त्यांना आपण इंटरेस्ट दिला. म्हणून इंटरेस्ट कमी झाल्यामुळे ती अशी रक्कम आलेली आहे.

श्री डी एस राजापुरे- इंटरेस्ट कमी झाला तरी लायबिलिटी आहे. हे काय एक्सपेंडिचर नाही. लायबिलिटीमध्ये आपल्याला 2500पटीमध्ये यायला पाहिजे कारण ही प्रिन्सिपलची रक्कम आहे. तुम्ही इंटरेस्ट पार्ट वेगळा दाखवला आहे. बॅलन्सशीट मध्ये शेडूल 4 मध्ये धनवर्षा रिकरिंग deposit 3 कोटी 89 लाख 92 हजार आणि Kमध्ये धनसंकल्प लखपती balance 4 कोटी 99 लाख 41 हजार 213 दाखवला आहे, हे विथ इंटरेस्ट आहे, म्हणून मी प्रश्न विचारला होता की या स्कीम मध्ये ही रक्कम विथ इंटरेस्ट आहे की विदाऊट इंटरेस्ट आहे.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-विथ इंटरेस्ट आहे. करेक्शन करून घ्या.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- राजापुरे साहेब खूप खूप धन्यवाद.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- आपण पुढचा प्रश्न घेऊ या.

श्री डी एस राजापुरे- माझं बोलणं संपलेलं नाही. बॅलन्सशीटवरचा माझा प्रश्न आहे. अवांतर मी बोलणार नाही. गेल्यावर्षी मॅनेजिंग मीटिंग honorarium होता 4 लाख 10हजार या वर्षी तो 5 लाख 10 हजार कसा झाला. माझ्या माहितीनुसार पहिल्या किंवा दुसऱ्या जनरल बॉडीमध्ये तो पाच लाख करून घेतला होता तर हा 10,000 वाढला कसा.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- यामध्ये संचालक मंडळाच्या एका सभासदाने 10,000/- अद्यापपर्यंत घेतलेले नाही. ते पेंडिंग आहेत. म्हणून प्रत्येक वर्षी दहा हजार वाढ दिसते.

श्री डी एस राजापुरे- ते पैसे घेतले नाही मग ठीक आहे म्हणूनच विचारलं की हा डिफरन्स कसा येतो.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-राजापुरे, पुढे जाऊया. प्रकाश पाटील आहेत.

श्री प्रकाश पाटील- नमस्कार साहेब. मला बोलायची संधी दिली त्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार. साहेब मला विषय क्रमांक 1 वर बोलायचं आहे कारण साहेब तो संपूर्ण विषय मागच्या जनरल बॉडीमध्ये क्रमांक ४वर होता तो आपली परवानगी घेऊन विषय 1वर घेण्यात आला होता. त्यावर आपण प्रतिउत्तर दिल आहे जेणेकरून मागच्या वर्षीएवढा मोठा विषय असताना, तो मी स्वतः हाताळलेला असताना याठिकाणी जो उल्लेख केला की सदर विषयावर काही सभासदांनी सभागृहात गोंधळ घालून चर्चा होऊदिली नाही हे पूर्णपणे चुकीचे आहे. हे मिनिट्स साहेब पास करू नका. हे मिनिट्स पास करण्यात येऊ नये अशी माझी विनंती आहे.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- पाटील साहेब तुम्ही जे पत्र दिले आहे त्या पत्राला पोच दिली जाईल. आता आपण पुढे जाऊया. अहवालाबद्दल जर आपल्याला काही प्रश्न असतील तर विचारा. तुम्ही जो प्रश्न उपस्थित केलेला आहे लेखी प्रश्न दिला आहे त्याला उत्तर मिळेल. आपले अजेंडा क्रमांक 2 वर काही प्रश्न असतील तर विचारा.

श्री प्रकाश पाटील- नक्की साहेब. मी पुढे काही विचारणार नाही. साहेब एवढीचमाझी विनंती आहे की हे मिनिट्स पास करण्यात येऊ नयेत. पुढच्या आमसभेत हे मिनिट्स पुन्हा करेक्शन करून घेऊया.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-ठीक आहे. तो प्रश्न याच्याशी रिलेटेड आहे. सारंग म्हणून मेंबर आहेत त्यांचा प्रश्न घेऊया.

श्री सारंग - नमस्कार वजरेकर साहेब. शुभ सकाळ आणि सर्व सदस्यांना माझा नमस्कार आणि सप्रेम जय महाराष्ट्र. तुमच्या संमतीने काही सभासदांना शुभेच्छा देऊ इच्छितो मी या प्लॅटफॉर्मवर, शुभेच्छा देऊ शकतो का

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-आपण थोडक्यात प्रश्नाकडे आलात तर बर होईल. शुभेच्छा द्या थोडक्यात. पुढील प्रश्नाकडे वळू या.

श्री सारंग- आपल्या आस्थापनांमध्ये सध्या होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये आपले जेसभासद निवडून आले त्या सर्व सभासदांचे हार्दिक अभिनंदन.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-तुम्ही आपल्या प्रश्नाबद्दल बोला.

श्री सारंग- या सभेमध्ये आणि मागच्या सभेमध्ये झालेले मिनिट्स आपण पाहिले आहेत.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- सारंग साहेब तुमचा अजेंडा क्रमांक 2वर काही प्रश्न आहे का.

श्री अरुण कोळी- साहेब माझा विषय हाच होता की आपण जो नफा तोटा पत्रकामध्ये तरलतानिधी पान क्रमांक 11 वर मराठीमध्ये वैधानिक तरलतानिधीउपविधीप्रमाणे नफ्याची विभागणी, त्याची वाटणी G1.1 मध्ये तरतूद दाखवा किंवा तुम्ही जी वैधानिक तरलतानिधी काढली आहे महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटी ऍक्टप्रमाणे कुठल्या नियमांतर्गत नफ्यातून तुम्ही तरलता काढली. त्या नियमाचा किंवा त्या उपविधीचा क्रमांक मला सांगावा. दुसरा प्रश्न सुद्धा आहे माझा.अगोदर याचे उत्तर द्या.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- सहकार कायदा अधिनियम 65 नुसार वैधानिक तरलता तरतूद केलेली आहे श्री अरुण कोळी- कुठल्या नियमानुसार

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- 65व्या नियमानुसार.

श्री अरुण कोळी- 65व्या नियमानुसार नफा विभागणीमधुन तरतूद केली आहे. तुम्ही बायलॉजमध्ये त्याची तरतूद आहे का ती मला दाखवा.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- मॉडेल बायलॉजप्रमाणे आपल्या रेग्युलेटरीबोर्डच्या इन्स्ट्रक्शन्स आहेत त्यानुसार तुम्हाला तरलता निधी तयार करणं अनिवार्य आहे.

श्री अरुणकोळी- साहेब तुम्ही मला दाखवा मला कुठला clause आहे ते सांगा मला. नियम सांगा. या नियमानुसार आम्ही नफ्यातून व्यवहार केला आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- act 65नुसार.

श्री अरुण कोळी- act नंतरची गोष्ट आहे. उपविधी नंबर सांगा.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- मॉडेल बायलॉज प्रमाणे वैधानिक तरलतानिधी हा अनिवार्य आहे आणि त्याप्रमाणे संस्थेचा कारभार चालू आहे.

श्री अरुण कोळी- मी तुम्हाला प्रश्न विचारला नाही.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- अहो साहेब तुम्हाला उत्तर मिळणं महत्वाचं आहे.

श्री अरुण कोळी- उत्तर मिळणं महत्त्वाचं नाही. उत्तर चुकीचं आहे म्हणून मी बोलतोय.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- साहेब तुम्हाला सहकाराची खूप माहिती आहे तुमचा रेकॉर्ड आहे परंतु जे काही बदल झालेले आहेत भारतीय राज्यघटनेनुसार 97 व्या घटना दुरुस्तीमध्ये, त्याचा जरा अभ्यास करा आणि त्यानंतरच उपविधी काय आहे MODEL BYE-LAWS काय आहे याबाबत तुम्ही प्रश्न विचारा.

श्री अरुण कोळी- माझ्या प्रश्नाचे उत्तर योग्य द्या की उपविधीमध्ये ही तरतूद आहे की नाही.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- याबद्दल तुम्हाला लेखी उत्तर देण्यात येईल तुमचा जो प्रश्न आहे त्याबाबत लेखी उत्तर देण्यात येईल.

श्री अरुण कोळी- लेखी नको. मला उत्तर आता द्या.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आपण जर पत्र दिले असते संस्थेला. वेळ दिला होता की तुम्हाला जे काही प्रश्न असतील ANNUAL रिपोर्टवर तर तुम्ही संस्थेला कळवावे. ज्या सभासदांनी आपल्याला लेखी पत्र दिले आहे त्या सर्व सभासदांच्या प्रश्नांची उत्तरे आपण दिलेली आहेत त्यात आपल्या प्रश्नांची पण नोंद केलेली आहे आपल्या प्रश्नाचे उत्तर दिलं जाईल.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-कोळी साहेब आता बरेचसे लोक वेटिंगवर आहेत. आपण पुढचा प्रश्न घेऊ या.

श्री अरुण कोळी नाही- साहेब हे बघा आता तुम्हाला मी स्पष्ट सांगतो पदसिद्ध अध्यक्ष साहेब आता ऑडिटोरियम मध्ये ही सभा होत नाही. ज्या सभासदांनी प्रश्न विचारण्यासाठी हात वर केलेला आहे त्या सभासदांचे प्रश्न जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत विषय संपला नाही पाहिजे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- तुम्ही ऍडव्हान्स मध्ये हा प्रश्न विचारायला पाहिजे होता.

श्री अरुण कोळी- पदसिद्ध अध्यक्षना विनंती आहे मी बोलताना मध्ये बोलू नका.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- नियामक मंडळाच्या 144 अनुसार आपण याची तरतूद केलेली आहे आणि आपल्याला तरतूद करणं अनिवार्य आहे. याबाबत जर तपशीलवार उत्तर तुम्हाला पाहिजे असेल तर ते सभा संपल्यानंतर लेखी स्वरुपात संस्थेकडून पंधरा दिवसात देण्यात येईल.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- कोळी साहेब संस्थेच्या 53 वर्षाच्या इतिहासामध्ये तरलता निधीची तरतूद झाली नव्हती ती मागील पाचवर्षांमध्ये झाली. याबद्दल तुम्हाला काही खंत आहे का.

श्री अरुण कोळी- खंतचा प्रश्न नाही. मी प्रश्न विचारला त्याचे उत्तर द्या. मी सरळ प्रश्न विचारला त्या प्रश्नाचे उत्तर द्या.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- ज्या पद्धतीने सभासद आमच्याकडे गुंतवणूक करतात त्याच्या गुंतवणूकीची काळजी घेणे हे विद्यमान कार्यकारिणीचे अग्रक्रम आहे आणि त्याप्रमाणे आम्ही तरलता निधी काढत आहोत. याबद्दल काही वाईट वाटण्याचं कारण नाही.

श्री अरुण कोळी- साठ वर्षांमधील फक्तपाच वर्षे तुम्ही संस्था सांभाळली साहेब.55 वर्षे दुसऱ्याने सांभाळलेली आहेसंस्था ठीक आहे ना.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- तुम्ही मागील 55 वर्षाची संस्था बघा आणि मागील पाच वर्षाची संस्था बघा. ज्या पद्धतीने या संस्थेचा कारभार चालला आहे ना तुम्हाला हीच खंत आहे की संस्थेची प्रगती होऊ नये. म्हणून त्यांना हा प्रश्न पडला आहे.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- कोळी साहेब सचिवांनी सांगितले आहे लेखी स्वरुपात देतील ते तुमच्या प्रश्नाची उत्तरे तुम्हाला. हे बघा कोळी साहेब तुमच्यासारख्या, सहकाराचा अनुभव असलेल्या व्यक्तीने थोडे सहकार्य करावे.

श्री कुटे - नमस्कार. सर्वप्रथम कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आपली ही सभा आज होत आहे आणि मूक भाव माध्यमातून आभासी तंत्राने ही सभा conduct करत आहात व त्यात आम्हाला सहभागी करून घेत आहात. तुम्हा सर्वांचे आभार. खरोखर कामकाज चांगल्याप्रकारे आहे पण कुठेतरी थोडेफार म्हणजे काही कल्पना नाही असं का होतय की व्यवस्थित काम होऊन देखील कुठेतरी विश्वासाला थोडाफार कमी जास्तपणा होतोय. माझी फक्त एकच विनंती होती साहेब की आभासी तंत्राने ही सभा सादर होते तर मग यासंबंधी काही डॉक्युमेंट आहेत ते आपल्याला प्रेझेंट करता आले असते. जर आता प्रश्न होतोय आपल्या अजेंडा नुसार तर मग समजा आपला जो ताळेबंद आहे तो जर प्रेझेंट करता आला असता तर बरं झालं असतं आणि कन्फ्यूजन कमी होईल. मग विषय पटापट उरकले जातील. धन्यवाद.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- कुटे साहेब मला वाटतं त्यांनी हा ताळेबंद संस्थेच्या वेबसाईट वर टाकलेला होता. मला वाटतं ज्या काही शंका असतील त्या अगोदर दिल्या असत्या तर त्यांना अभ्यास करून आपल्याला सुद्धा इथे उत्तर दिलं असतं. आपल्याकडे बरेच प्रश्नआले आहेत ज्यांची लेखी स्वरूपात आपल्याला उत्तरे दिली आहेत. मला वाटते आपण पुढे जायला हरकत नाही.

श्री कुटे - धन्यवाद साहेब.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- विषय क्रमांक 2 साठी सूचक आणि अनुमोदक द्यावे.

श्री प्रवीण सावंत- आता जो विषय आहे ताळेबंदचा त्याला माझे अनुमोदन आहे.

संस्थेचे मानद सचिवन श्री संजय गावंडे- धन्यवाद.

चर्चेअंती विषय क्र.2 पास करण्यात आला. त्यानुसार ठराव पास करण्यात आला

**ठराव क्र.2 ठराव पास करण्यात आला की 1 एप्रिल 2019ते 31 मार्च 2020 या कालावधीचा वार्षिकअहवाल, शासकीय वैधानिक लेखापरीक्षित ताळेबंद, नफा-तोटा पत्रक स्विकारुन त्यास सभागृहाने सर्वानुमते मंजुरी दिली.**

सुचकः श्री अनिल कुटे

अनुमोदकः श्री प्रवीणसावंत

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

श्री प्रवीण सावंत- मला आणखी एका विषयावर इथे बोलायचे आहे. कृपया मला बोलण्याची परवानगी आहे का.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-हो बोला प्रवीण सावंत.

श्री प्रवीण सावंत- आपली जी सोसायटी आहे ती उपविधी प्रमाणे चालत होती, परंतु आता ती 97 व्या घटना दुरुस्तीनुसार चालवली जात आहे याचा अनुभव मागच्या निवडणुकीमध्ये आलेला आहे. सतत दोन termनंतर तिसऱ्यांदा निवडणूक लढता येत नाही अशी आपल्या उपविधीमध्ये तरतूद आहे परंतु 97 व्या घटना दुरुस्तीनुसार

आणि मॉडेल बायलॉजनुसार त्याच्यामध्ये ही तरतूद नाही. त्यामुळे लोक स्वतःच्या सोयीप्रमाणे आपला फायदा घेत आहेत ही गोष्ट मला या ठिकाणी नमूद करावीशी वाटते.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- धन्यवाद सावंत.

संस्थेचे मानद सचिव संजय गावंडे यांनी विषय क्रमांक 3वाचून दाखवला.

**विषय क्रमांक 3: संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे तसेच सन 2020-2021 या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.**

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- अहवाल वर्षात 14 कोटी 33 लाख 22 हजार 965 इतका निव्वळ नफा झाला. त्यात मागील शिल्लक रोख एक कोटी 64 लाख 90 हजार 819 हे घेऊन अहवाल साली पतसंस्थेस नफा 15 कोटी 98 लाख 13 हजार 784 झाला आहे. त्याची विभागणी पुढील प्रमाणे करण्यात आली आणि त्याप्रमाणे संचालक मंडळशिफारस करत आहे त्यास मान्यता द्यावी. मानद सचिव संजय गावंडे यांनी नफा विभाजन वाचून दाखवला. नफा विभागणीस मान्यता द्यावी. सन 2020-21 बजेट पान क्रमांक 59 ते 61 यावर आहे नफा विभागणी आणि बजेट याला मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो तसेच त्याला सूचक आणि अनुमोदक द्यावे अशीही मीविनंती करतो.

श्री राजेंद्र झाडे - साहेब हा विषय घेण्यापूर्वी 1-2 साधारण प्रश्न होते ते विचारण्याची परवानगी द्यावी.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- आपला प्रश्न अजेंडा क्रमांक 3 बद्दल आहे का.

श्री राजेंद्र झाडे - हो, या विषयावर मला बोलायच आहे. पान क्रमांक 11वर भाग रकमेवर 15 % लाभांश आपण जाहीर केलेला आहे संचालक मंडळाने आणि वर्गणीवर व्याज किती टक्के जाहीर केलेला आहे हे या ठिकाणी दिलेले नाही तर माझा प्रश्न आहे सभासद वर्गणीवर किती टक्के व्याज देणार आहात.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- या नफा विभाजनामध्ये लाभांश दिला जातो. वर्गणी वरील व्याज आहे ते आपण याच्याअगोदर दिले जातात आणि 10 % व्याज आपण दिले आहे तसेच लाभांश सुद्धा दिलेला आहे 2019-20 या वर्षाचा.

श्री राजेंद्र झाडे - मागच्या वेळेला पण माझा हाच आक्षेप होता की तुम्ही प्रत्येक वेळी भाग रकमेवर म्हणजे जी नेट रक्कम आहे पंधरा हजार रुपये त्यावर तुम्ही जास्त व्याजदर देता तर तो न देता तुम्ही तो थोडा कमी करून सभासदाची वर्गणी ही जास्त जमलेली आहे त्यावर तुम्ही 12 टक्के दिलेत तर सभासदांच्या खिशामध्ये जास्तीचा पैसा जमा होईल.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- याबाबत आपण बऱ्याचवेळेला चर्चा केलेली आहे. मागच्या सर्वसाधारण सभेत सुद्धा यावर चर्चा झालेलीआहे आणि याबाबत आपल्याला उत्तर देखील देण्यात आलेला आहे संस्थेची आर्थिकस्थिती आहे त्यानुसारच संचालक मंडळ निर्णय घेते.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- तुमची सूचना रास्त आहे. म्हणून यावर्षी अमेंडमेंट आणली आहे त्यामध्ये शेअर्सचे 15,000वरून 30,000 करण्याबाबत आहे. 15,000 वर जो 2250 डिव्हिडंड दिला जातो तो आता

30,000 केल्यामुळे 4500 रुपये डिव्हिडंड दर वर्षी मिळणार आहे याची नोंद घ्या आणि शेवटी ही आर्थिक संस्था आहे. कोणी काही सांगितलं आणि अंमलबजावणी झाली अशातला भाग नाही. सगळी सोंग करता येतात परंतु पैशाचं सोंग करता येत नाही.

श्री राजेंद्र झाडे- शिल्लक नफा पुढच्या वर्षी वर्ग केला आहे 9 लाख 78 हजार 144 . मागच्यावेळी आपला नफा 1कोटी 64 लाख 90 हजार 819 ठेवला होता या वर्षी जास्त ठेवला आहे त्याचं कारण काय आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- 9 लाख 44 इतकाच आहे. कमी आहे. मागच्या वर्षी जो नफा ठेवला होता तोआपल्याला काही इन्कम टॅक्स मध्ये जे भरण्याचे होते पैसे त्याच्यासाठी आपण ठेवला होता पण या वर्षी आपल्याला सांगायचं म्हणजे इन्कम टॅक्सची केस हायकोर्ट मध्ये आपण जिंकलेली आहे तरीसुद्धा आपल्या बाकीच्या केसेस सुद्धा आहेत. इन्कम टॅक्सकडे पेंडिंग आहे. स्क्रुटीनीमध्ये असल्यामुळे दरवर्षी ते आपल्याला नोटीस पाठवत आहेत परंतु कलम 80p च्या अंतर्गत आपल्याला जी सवलत मिळते त्यानुसार आपल्याला हायकोर्टमध्ये ती मिळाली आहे. या बाबतीत आपल्याला 20 टक्के पैसे भरावे लागतात त्यासाठी आपण ती तरतूद केलेली होती. यावर्षी आपल्याला 20% भरायला लागले नाहीत सध्यातरी आणि गेल्या वर्षी 92 लाख जे आहे ते ॲडजेस्ट झालेले आहेत. त्यामुळे यावर्षी त्याची जरुरत नाही म्हणून हा नफा या वर्षी कमी ठेवला आहे.

श्री राजेंद्र झाडे- आपले जे संकल्प सिद्धीकॅलेंडर छापली आहे ते प्रत्येक सभासदाला आपण कार्यालयात येऊन घेण्यास भागपाडले. त्याऐवजी जर तुम्ही अहवाल ज्याप्रमाणे छापता आणि त्याच्या मागेप्रत्येक सभासदाचे नाव आणि नंबर लिहिता त्याप्रमाणे प्रत्येक डिव्हिजनमध्ये पाठवले असते तरी त्या लोकांचे श्रम वाचले असते. त्या लोकांचा वेळ वाचलाअसता याची कृपया नोंद घ्यावी.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- तुमची सूचना चांगली आहे पुढील वेळी जेव्हा दिनदर्शिका प्रकाशित होईल त्यावेळी अशाप्रकारे आम्ही नियोजन करू.

श्री राजेंद्र झाडे - सर आपल्या गाडीवर आपला जो अतोनात खर्च होतो त्या स्कॉर्पिओ ऐवजी आपण जर ईको गाडी घेतली असती त्याला जर प्राधान्य द्या.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- ठीक आहे अजून एक गाडी घेतली जाईल. भविष्यामध्ये इलेक्ट्रिकल गाडी घेऊ. 650 कोटीची संस्थाआहे.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-गाडीचा विषय संपलेला आहे. आपण पुढील प्रश्नाकडे जाऊ.

श्री मुकेश पवार- सर माझा एक वेगळा प्रश्न होता. आपण ही मिटिंग conduct करताय त्याचा तुमच्याकडे पूर्ण डाटा आला आहे की कोण कोण मिटींग अटेंड करत आहेत किंवा रजिस्ट्रेशन केला आहे. मीटिंगसाठी जे पाचशे रुपयाची कुपन दिलेला आहे ते पाचशे रुपये सोसायटीच्या अकाउंटला तुम्ही जमा का नाही केले. कारण हे खरेदी करा ते खरेदी करा फुकटची डोकेदुखी आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- हे जे पाचशे रुपयाचे कुपन दिलेले आहे ते सभेला उपस्थित आहेत किंवा ज्यांनी रजिस्ट्रेशन नोंदणी केलेली आहे त्यासाठी दिले आहे. हे पाचशे रुपये आपण अकाउंटमध्ये जमा करू

शकत नाही आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अडचणी आहेत की आपण रिफ्रेशमेंटसाठी कुठे जाऊ शकत नाही. बऱ्याच गोष्टी आहेत म्हणून हा निर्णय घेतलेला आहे

श्री मुकेश पवार- साहेब, रिफ्रेशमेंटला जाऊ शकत नाही म्हणून ही विनंती होती की मीटिंग अटेंड झाल्यानंतर तुम्हाला तर कळणार आहे की किती लोकांनी मिटींग अटेंड केलेली आहे त्यानंतर ते पैसे जमा करा ना. काही हरकत नाही. ती खादी ग्रामोद्योगची साईट ओपन होत नाही.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आता 1एप्रिल नंतर ती साईट ओपन होईल त्यामध्ये तसेच दिले आहे.

श्री मुकेश पवार- हो सर, 1एप्रिलपासून आत्ता गुगल वरून जरी साईड ओपन केली तरी ती सुरू होत नाही.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आम्ही साईट ओपन केलेली आहे. साईट ओपन होते. आपण सर्वांना विनंती करतो की विषय क्रमांक 3ला सूचक आणि अनुमोदक द्यावे

डॉ. विजय आहेर- नमस्कार. सध्याचे संचालक मंडळ काम करत आहे. गेली पाच वर्षे सभासदांच्या हिताचे अनेक निर्णय योग्य प्रकारे घेतलेले आहेत त्याबद्दल सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन आणि यापुढेही जे काही येणारे संचालक मंडळ असेल ते सभासदांच्या हिताचे अनेक निर्णय घेतील आणि खरोखरच चांगल्या प्रकारे काम करतील अशी मला आशा आहे. माझं विषय क्रमांक 3ला पूर्ण अनुमोदन आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- धन्यवाद आहेर साहेब.

चर्चेअंती विषय क्र.3 पास करण्यात आला. त्यानुसार ठराव पास करण्यात आला

**ठराव क्र.3: ठराव पास करण्यात आला संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस तसेच सन 2020-2021 या अंदाजपत्रकास सभागृहाने सर्वानुमते मंजुरी दिली.**

सुचकः श्री मुकेश पवार

अनुमोदकः श्री विजय आहेर

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे यांनी विषय क्रमांक 4 वाचून दाखवला.

**विषय क्रमांक 4: शासकीय लेखापरीक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांचा सन 2019-2020 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.**

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे यांनी विषय क्रमांक 4 वाचून दाखवला.

शासकीय लेखापरीक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांचा सन 2019-2020 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेण्यात आली.

चर्चेअंती विषय क्र.4 पास करण्यात आला. त्यानुसार ठराव पास करण्यात आला

**ठराव क्र.4: ठराव पास करण्यात आला की शासकीय लेखापरीक्षक वअंतर्गत लेखापरिक्षक यांच्या सन 2019-20 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेऊन तो सर्वसाधारण सभेने सर्वानुमते मंजुर केला.**

सूचकः श्री प्रविण सावंत

अनुमोदकः श्री विश्वास घोरपडे

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्रमांक 5: सन 2020-2021 या आर्थिक वर्षासाठी नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नियुक्तीस मान्यता देणे.**

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे - आपण वैधानिक लेखापरीक्षक यांची नियुक्ती केलेली आहे. यावेळी संचालक मंडळाला त्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार आपण पी पी मुथा यांना वैधानिक परीक्षणाचे काम दिलेले आहे. आपल्याकडे पाच फर्मचे प्रपोजल आले होते. त्यातील जे कमीत-कमी कोटेशन होते त्यांची आपण निवड केलेली आहे आणि ते पी पी मुथा अँड असोसिएट्स हे असून त्यांनी 95% of annual turnover of F.Y.2019-20 + taxes अशाप्रकारे त्यांनी कोटेशन दिले आहे. त्यांचं कोटेशन सर्वात कमी आहे. त्यामुळे त्यांची निवड करण्यात आलेली आहे. सन 2020-21 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून त्यांची नियुक्ती केलेली आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी व यास सूचक आणि अनुमोदक द्यावे.

| | | |
|---|---|---|
| 1. | गोल्ड मार्ट अँड असोसिएट, मालाड मुंबई | 8.25 लाख + जीएसटी |
| 2. | सी. पी. लोधा अँड असोसिएट्स, नाशिक | 8 लाख + जीएसटी |
| 3. | संतोष ----अँड कंपनी, नाशिक | 8.75 लाख + जीएसटी |
| 4. | आर पी डी अँड असोसिएट्स,नाशिक | 8.45 लाख + जीएसटी |
| 5. | के.बी.पी.एस. अँड कंपनी, मुंबई (formerly known as पीपी मुथा अँड असोसिएट्स) | 95% of annual turnover of F.Y.2019-20 + जीएसटी (7,35,132/- + GST) |

त्यामुळे LOWEST QUOTATION म्हणून के.बी.पी.एस. अँड कंपनी (पी पी मुथा अँड असोसिएट्स) मुंबईची नियुक्ती केलेली आहे या विषयास मंजुरी देण्यात यावी.

चर्चेअंती विषय क्र.5 पास करण्यात आला. त्यानुसार ठराव पास करण्यात आला

**ठराव क्र.5: ठराव पास करण्यात आला की आलेल्या निविदांमधून के.बी.पी.एस. अँड कंपनी (पी.पी. मुथ्था अँड असोसिएट्स) यांचा ऑडिट संबंधी असलेला अनुभव व त्यांनी निविदेत दिल्याप्रमाणे त्यांची फी 95% ऑफ anual turn over अधिक सर्विस टॅक्स लक्षात घेऊन सभागृहाने सर्वानुमते त्यांची सन 2020-21 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती केली.**

**सूचकः श्री प्रवीण सावंत**

**अनुमोदकः श्री परेरा**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

श्री डी एस राजापुरे- मला थोडं बोलायचं होतं. कारण ह्या सभेमध्ये काय होतय तुम्ही तिथून सिलेक्ट करता की कोणाला बोलायचं नाही आणि कोणाला बोलायचं. त्यामुळे मीटिंग खूप कमी वेळात तुम्ही आटोपती घेत आहात आणि विषयांवर सविस्तर चर्चा होत नाही. म्हणून तुम्ही दोन मिनिट ऐकून घ्या नंतर तुम्ही बोला. जेव्हा सभागृहाचा विषय असतो तेव्हा त्याला वेळेची मर्यादा असते ते सहा वाजेपर्यंत संपवायचं असतं परंतु ऑनलाइन मिटींग आहे यासाठी तुम्हाला वेळेची मर्यादा नाही तर तुम्ही घाईघाईने पुढे जात आहात. बऱ्याच विषयांवर चर्चा होत नाही. मी मगाशी दोन प्रश्न विचारले बाकीचे प्रश्न मला विचारायचे आहेत. तर मला म्यूट करण्यात आलं किंवा बोलायला देत नाही. तर हे मला योग्य वाटत नाही याचीनोंद घ्यावी आणि मला मागच्या विषयावर चर्चा करायची आहे पण तुम्ही अनुमोदन घेऊन तो विषय पास केला आहे. मला त्या विषयावर एक प्रश्न विचारायचा आहे तर तोविचारण्यास वेळ दिलेला नाही. तुम्ही सारस्वत बँकेमध्ये 50 लाखावरून 75 लाख वैधानिक तरलता निधी ठेवला आहे. बाकीच्या बँकांमध्ये जी वैधानिक तरलता ठेवली आहे त्यावर आपल्याला त्या वर्षीचे व्याज मिळाल आहे पण सारस्वत बँकेमधून आपल्याला काही व्याज मिळाले नाही तरी याचे स्पष्टीकरण नाही. म्हणजे कोणी प्रश्न विचारला नाही ती वेगळी गोष्ट. पण मला काही प्रश्न विचारायचे असतील तर मला म्यूट केल्यामुळे प्रश्न विचारता येत नाहीत.माझे प्रश्न संपले का ते विचारूनच पुढच्या व्यक्तीला विचारण्यात यावे असा माझा विचार आहे आणि मी जे विचारल आहे त्याचं मला उत्तर द्या व मगच मी दुसरा प्रश्न विचारेन.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आपण जे डिपॉझिट ठेवले आहे ते सारस्वत बँकेमध्ये सन 2019-20 मध्ये.

श्री डी एस राजापुरे- नाही. सन 2018 19 मध्ये पण तुमचे सारस्वत बँकेमध्ये 50 लाख होते.सगळ्या बँकेमध्ये आपले पैसे होते त्याचे 2018-19चे व्याज आपल्याला2019-20 मध्ये व्याज मिळाले. तर या बँकेचे व्याज मिळाले नाही ज्या बँकेचे मिळाले परसेंटेज मला काही घेणं देणं नाही जी काही रक्कम मिळाली आहे पण सारस्वत बँकेकडून आपल्याला काहीच मिळाले नाही असे बॅलेन्स दाखवते यावर आपले मत सांगा.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- 19 लाख 20 हजार इतके व्याजआपल्याला मिळाले आहे सारस्वत बँकेमधून.

श्री डी एस राजापुरे- कोणत्या पानावर दाखवलेला आहे ते सांगा.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- पान क्रमांक 58 वर आहे. टोटल रिसिव्हड केला तो लिहिलेला आहे 47 लाख 51 हजार 351.

श्री डी एस राजापुरे- पण त्याची बेरीज ह्याच्याशी मॅच होत नाही बाकीच्या बँकेचे इंटरेस्टे ऍड केलेले आहे. त्या सर्वांची टोटल केली तर ती रक्कम मॅच होत नाही. तुम्ही 6 मध्ये दाखवले आहे पेज क्रमांक 54 वर तसं तुम्हीD,E,F मध्ये असेट मध्ये दाखवले आहे. प्रत्येक बँकेचे दाखवले आम्हाला एवढे या वर्षातमिळालं किंवा जो काही इंट्रेस्ट रिसिव्ह झाला हे कसे सिद्ध होईल की हे तुम्ही यामधुन केला आहे की तुमच्या चालू निधीमधून केलेला आहे.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- ते वर्डींग राहिल आहे ते मान्य करून टाका.

श्री राजापुरे- तो विषय संपवून टाका पण बाकीचे विषय आहेत अजून बाकी. त्या विषयावर चर्चा होतच नाही. तुम्ही सारखं अनुमोदन द्या, सूचक द्या बोलता हे मला पटत नाही. याची नोंद घेण्यात यावी. कारण सभागृहामध्ये मीटिंग घेण्यासाठी एक लिमिट असतं पण ऑनलाईन मीटिंग घेण्यासाठी आपल्याला अशी काहीच कंडिशन नाही.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- राजापुरे साहेब तुम्हाला दुसऱ्यांदा संधी दिली असताना सुद्धा तुम्ही असे आक्षेप करताय की संधी मिळत नाही म्हणून.

श्री राजापुरे- एका सभासदाने विचारलं होतं की आपल्याला सभागृहाची मीटिंग असल्यामुळे ती सहा वाजेपर्यंत संपवावी लागते पण ऑनलाईन मीटिंग तुम्ही एवढी घाई करून का पुढे जाता.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- नोटीसमध्ये सभेची वेळ दिलेली आहे.

श्री राजापुरे- नाही तुम्हाला प्रश्न विचारला तेव्हा तरी तुम्ही सांगायला पाहिजे होतं उत्तरात तसं नाहीये तुम्ही रिटर्नमध्ये कुठे दिलं असेल तर ते मला मान्य असेल ते मी पाहिलं नाही पण जेव्हा सभासदांनी विचारलं की तुम्हाला वेळेचे लिमिट आहे का त्याचे उत्तर येस किंवा नो पण दिलेले नाही. किती वाजेपर्यंत तुम्हाला याची मुदत आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आपल्याला तीन तासाची मुदत आहे अकरा ते दोन पर्यंत.

श्री राजापुरे- तर हे आधीच सांगायला पाहिजे होतंआणि महत्त्वाचं म्हणजे तुम्ही बजेटसाठी अनुमोदन मागत आहात.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आपण ऑडिटवर चर्चा करत आहोत.

श्री राजापुरे- पण बजेटवर सुद्धा चर्चा करायची होती मला. तुम्ही मोटर वेहिकल वर 5 लाख खर्च दाखवत आहात त्याबाबतीत स्पष्टीकरण द्यावे. तुम्ही प्रोविजन करताय 5लाख डेप्रिसिएशन 5लाख. मग माझ्या माहितीनुसार डेप्रिसिएशन जेव्हा गाडी नवीन असेल तेव्हा जास्तअसतं आणि फ्युचरमध्ये त्याचे डेप्रिसिएशन कमी होतं. या वर्षी जर अडीच लाखआहेत पुढच्या वर्षी त्याचे पाच लाख करत होता त्याचे डिटेल दिले तर बर होईल. यावर्षी कोरोना काळात कॅन्टीन तुम्ही सहा महिने वापरत नाही तरी पण तुम्ही कॅन्टीन खर्च साडेतीन लाख रुपये दाखवत आहे तो गेल्या वर्षी अडीच लाख होता हे तुमचे जे प्रोविजनमध्ये आहे आकडे ते कुठेतरी मॅच झाले पाहिजेत.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आपण जे कर्ज देतो सभासदांनासर्व सुविधा देतो त्याच दिवशी त्या कर्जाची रक्कम त्यांच्या अकाउंटमध्ये जमा होते. त्यासाठी आपल्याला बँकेत जाव लागतं आयडीबीआय बँक, मुंबई बँक या बँकेत आपण सतत जात येत असतो. त्यामुळे आपल्याला गाडी चालवताना जो खर्च होतो डिझेलचा तो खर्च सुद्धा याच्यात झालेला आहे आणि मागच्या वर्षी जो खर्च मागच्या वर्षीगाडी घेतली ती मागच्या आर्थिक वर्षामध्ये सहा महिने होती पण या वर्षीपूर्ण आर्थिक वर्षात होती. यामध्ये तुम्ही बघाल की आता आपल्याला जो मागच्यावर्षी पेक्षा अर्ध्याने कमी झालेला आहे. मागच्या वर्षी 1 लाख 36 हजार 270 होता या वर्षी तो 60,577 झाला. हे कमी होण्याचं कारण की आपलीसंस्थेची गाडी. त्यामुळे हा खर्च कमी झालेला आहे.

श्री राजापुरे-  गावंडे साहेबतुम्ही दिशाभूल करू नका तुम्ही आता जे बोलता गाडी आता घेतली गाडी 2018-19 मध्ये घेतलेली आहे.2019-20 मध्ये नाही.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- मी तेचबोललो. गाडी आपण 2018-19 मध्ये घेतलेली आहे. 2018-19 च्या आर्थिक वर्षातसहा महिनेच आपली गाडी चालवलेली होती आणि या वर्षी पूर्ण आर्थिक वर्षातचालवलेली आहे याचा पूर्ण खर्च झालेला आहे.

श्री राजापुरे-  हो बरोबर आहे. गावंडे साहेब तुम्ही बोलता ते मला पटतंय. पण मी प्रोव्हिजनबद्दलबोलतोय. मी करंट बद्दल बोलतोय.2019-20बद्दल बोलत नाही.2020-21मध्ये दाखवले ते बोलतोय मी.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आपल्याला जो खर्च होणार आहे तो बजेटमध्ये दाखवलेला आहे. बजेट मध्ये प्रोव्हिजन केलेली आहे तो खर्च प्रत्यक्षात झालेला नाही.

श्री राजापुरे-  पण बजेट करतानाही मागे किती खर्च केलात पुढे किती होणार टेक्निकल डाटा असतो मागच्यावर्षातील गाडीचं डेप्रिसिएशन जर अडीच लाख असू शकतो तर पुढच्या वर्षीत्याच्या पर्सेंटेज कमी होतात मग या वर्षी पाच लाख कुठल्या बेस वर केलं.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- डेप्रिसिएशन जरी कमी होत असेल तरी आपलामेंटेनन्स येतोय बाकी जो खर्च वाढतो तो सर्व पकडून आहे आणि बजेट आहे ते.खर्च केलेला नाहीय.

श्री राजापुरे-  मला सर्व मान्य आहे पण एक्सपेंडिचर अकाउंटमध्ये तुम्ही डेप्रिसिएशन हेड मध्ये काय काय फिगर टाकली आहे ती बघा.गाडीचा डेप्रिसिएशन तुम्ही किती दाखवले. तुम्ही विषय डायव्हर्ट करू नका.

संस्थेचे संचालक सदस्य श्री सचिन उसरकर - प्रत्येक वर्षी 15%कमी होतो.

श्री राजापुरे-  गेल्या वर्षी गाडीची जी किंमत होती ती या वर्षी नक्कीच कमी झाली आणि गाडीचा डेप्रिसिएशन कसं वाढलं हा प्रश्न आहे. त्याचे उत्तर मला पाहिजे. तुम्ही अजूनही स्टडी करा. जेव्हा गाडी नवीन असते तेव्हा त्याचं डेप्रिसिएशन जास्त असतं.जशी गाडी जुनी होत जाते तसतसे डेप्रिसिएशन पर्सेंटेज कमी होतं.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावडे- होय पर्सेंटेज कमी होतं.

श्री राजापुरे-  पर्सेंटेज कमी झाल्यानंतर बेसिक कॉस्टवर पर्सेंटेज कमी होणार. तर गेल्या वर्षी तुमच डेप्रिसिएशन बघा. ते गेल्या वर्षी आहे 2 लाख 26 हजार 214 आणि तुम्ही या वर्षी प्रोविजन पाच लाखाची करत आहात. म्हणजे डबल पेक्षा जास्त करताय हे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- गेल्या वर्षी जे आहे ते सहा महिन्याचे आहे पण पूर्ण वर्षाचा आर्थिक वर्षाचा पकडलेला आहे बजेटमध्ये.त्यामुळेच डेप्रिसिएशन जास्त दाखवल आहे.

श्री राजापुरे-  6 महिने कसं पकडलं. गाडी आपण 2018-19 मध्ये घेतली आहे. 2019-20 मध्ये नाही घेतली. 2019-20 मध्ये 2 लाख 26 हजार 214 आहे, याचे स्पष्टीकरण पाहिजे. तुम्ही काहीही मनाला येईल ती फिगर जोडायची नाही.

संचालक सदस्य श्री सचिन उसरकर- सहा महिन्याचे डेप्रिसिएशन डबल झालं ना आणि त्यामध्ये ॲड करा.

श्री राजापुरे-उसरकर साहेब 2018-19 ला तुमचं 1 लाख 22 हजार सहा महिन्याचं होतं, 2019-20 मध्ये वर्षाचं होतं. तुम्ही प्रोविजन फायनान्शियल इयरला करता हे तर मान्य आहे. 2019-20 मध्ये तुमच्या गाडीवर तुम्ही जो ओपनिंग बॅलन्स होतं 15 लाख 8 हजार त्यावर तुम्ही 2,26,000 डेप्रिसिएशन2019 ला दाखवलं म्हणजे तुमच्या गाडीचा व्हॅल्युएशन 12 लाख 81हजार. जर 12 लाख 81 हजार याचे 50 टक्के जास्त डेप्रिसिएशन दाखवले पुढल्या वर्षी.

संस्थेचे मानद सचिव संजय गावंडे - बॅलन्सशीटमध्ये नियमाप्रमाणे बजेटरी प्रोविजन केलेली आहे.

श्री राजापुरे- नाही. तुमची चूक झालेली आहे ते मान्य करायला तयार नाही.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- बजेटरी प्रोविजन केली म्हणजे तो खर्च झाला असे नाही. जर प्रोव्हिजन ५ लाख केली असेल आता त्यातले जर ३ लाख खर्च झाले तर २ लाख कॅरी फॉरवर्ड होणारच आहेत.

श्री राजापुरे- मडगांवकर साहेब तुम्ही म्हणताय ते बरोबर आहे. शंभर टक्के खरे आहे पण आपल्याकडे फिगर डेटा असताना आपल्याला माहित आहे तेवढेच करायला पाहिजे एक्स्ट्रा का करता.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- ठीक आहे. पुढल्या वेळी प्रोव्हिजन न करता जो काही खर्च होईल तो ताळेबंदमध्ये सादर केला जाईल.

श्री राजापुरे- नाही. प्रोव्हिजन जरूर करा पण ती किती करताय प्रोविजन किती लाखाची करायचीआहे की ही तुमची नजर चूक आहे की प्रिंटिंग मिस्टेक आहे हे सर्व काही डॉक्युमेंट करा तुम्ही.

संस्थेचे मानद सचिव श्री संजयगावंडे- बजेटरी प्रोविजन जास्त केलेली आहे याची नोंद केली जाईल आणि यापुढे बजेटरी पाहिजे तशी प्रोव्हिजन केली जाईल.

श्री राजापुरे- आपल्याला माहिती आहे की किती खर्च येणार आहे 101% माहिती आहे. कारण यात तुम्हाला नाही दोन रुपये कमी होणार नाही दोन रुपये जास्त होणार परंतु ते पर्सेंटेज फिक्स आहे. आणि पर्सेंटेजनुसार होणार आहे तुम्हाला मनाला आलं किंवा माझ्या मनात आलं तर खर्च वाढवता येत नाही. डेप्रिसिएशनचा खर्च परफेक्ट असायला पाहिजे असं माझं वैयक्तिक मत आहे तर तुम्ही मान्य केलं का.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- तुमच्या सूचनेचे स्वागत आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आम्ही आमची चूक मान्य करतो. या वर्षी बजेटमध्ये जास्त प्रोविजन केलेली आहे पुढील वर्षी असं होणार नाही.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- हे लक्षात घ्या कोणत्याही हेड खाली बजेट प्रोविजन जी असते तो संपूर्ण पैसा सिस्टीम मध्ये आहे एखाद्या हेड मध्ये प्रोविजन जास्त आहे कमी आहे हा भाग दुय्यम आहे. जर जास्त खर्च झाला असेल तर तो बॅलन्स शीटमध्ये शो होतो किंवा कमी खर्च झाला असेल तर तोही बॅलन्स शीट मध्ये होतो.

श्री राजापुरे- सगळ्या गोष्टी मला मान्य आहेत. बजेटरी प्रोविजन अंदाज असतो.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- ठीक आहे. धन्यवाद.

श्री राजापुरे- मला दुसरं असं विचारायचं आहे की तात्काळ बँकिंगसाठी तुम्ही 2.50 लाखाचे प्रोविजन केले आहे. ते तात्काळ बँकिंग घेतले आहे 2लाख 83 हजारला आणि पुढल्या वर्षी त्याच्यावर डेप्रिसिएशन तुम्ही 2.50लाखाचे प्रोविजन केले आहे. म्हणजे तात्काळ बँकिंग पुढच्यावर्षी संपून जाणार का.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे-15%डेप्रिसिएशन आहे. ते शून्य कधीच होणार नाही

श्री राजापुरे- पण आज आमचा क्लोजिंग बॅलन्स आहे 2,83,200/-आणि पुढल्या वर्षी त्याचे डेप्रिसिएशन2.50 लाखाचे दाखवता. यावर्षी तुम्ही 1 लाख 88 हजार केले. म्हणजे जवळपास 40% जर 2 लाख 83हजारचे 40% काढले तर ते 2 लाखाच्या आसपास जाईल, पण हे 2.50 लाख म्हणजे 2 लाख 83 हजार 40% काढले म्हणजे साधारण एक ते सव्वा लाख जाईल पण तुम्ही अडीच लाख केलं. यामध्येही तुम्हाला माहिती आहे की प्रोव्हीजन करायची.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- मागच्या वर्षी तात्काळ बँकेची एक मशीन घेतली होती आणि आपण मंदाकिनी ऑफिस सुरू केल्यानंतर दुसरी मशीन घेतली असे आपण दोन युनिट घेतले आहेत.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- भविष्यामध्ये आपण ब्रिट वाशी, तारापूर, DAE येथील सभासदांना सेवा पुरवण्यासाठी तात्काळ बँकिंगची सुविधा सर्व ठिकाणी देणार आहोत.

श्री राजापुरे- ठीक आहे तुमचं मान्य आहे. तुम्ही हे युनिट घेतले आहे का आता.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- हो घेतले आहे 4 लाख 72हजार देऊन घेतले आहे तात्काळ बँकिंग सॉफ्टवेअर.

श्री राजापुरे- 4 लाख 72 हजार हे आपण सन 2019-20 मध्ये की सन 2020-21 मध्ये तुम्ही कधी खरेदी केल आहे.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- सभासदांची गरज लक्षात घेता मंदाकिनी ऑफिसमधून आम्ही सभासदांना जी सेवा पुरवली त्यासाठी तिथे ॲडिशनल तात्काळ बँकिंगचे सॉफ्टवेअर घेतलेले आहे. भविष्यामध्ये ब्रिट वाशी, तारापूर,DAEयेथील सभासदांना सेवा पुरवण्यासाठी तात्काळ बँकिंग घेणार आहोत.

श्री राजापुरे- हो घेतली असेल तर मग ते शक्य आहे. आणि दुसर मला विचारायच आहे या करोना काळामध्ये माझ्या माहितीनुसार सोसायटी ऑफिस चार-पाच महिने बंद होते.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- नाही साहेब, पूर्ण सेवा आम्ही मंदाकिनी ऑफिसमधून सभासदांना दिली आणि सभासदांनी याची नोंद घेतलेली आहे. कदाचित तुम्हाला दिसलं नसेल परंतु कोरोना काळामध्ये आमचा पूर्ण स्टाफ करोना पॉझिटिव्ह होऊन सुद्धा त्यातून फिट झाल्यानंतर कामावर हजर झालेला आहे आणि सेवा पुरवलेली आहे.

श्री राजापुरे- या गोष्टी मान्य आहेत मंदाकिनी ऑफिस सुरू होतं पण आतल ऑफिस बंद होतं.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे - आतील ऑफिस सुद्धा चालू होते. स्टाफ आतमध्येही काम करत होता. 13 एप्रिल पासून आपलं ऑफिस सुरूच आहे.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-धन्यवाद राजापुरे. आता आपण पुढे जाऊ या.

श्री राहुल शर्मा- माझा कोणताही प्रश्न नाही. मी धन्यवाद देतो आजच्या जनरल बॉडीला. खूप चांगल्या प्रकारे ऑनलाइन पद्धतीच्या माध्यमातून आम्हाला बोलण्याची संधी दिली. धन्यवाद.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- धन्यवाद राहुल शर्माजी.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे यांनी विषय क्रमांक 6 वाचून दाखवला.

**विषय क्रमांक 6 : सन 2018-2019 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची व त्यासंबंधीच्या दोष दुरुस्ती अहवालाची (compliance report) नोंद घेणे.**

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-दोष दुरुस्ती अहवाल हा खूप मोठा आहे आणि तो वाचायला खूप वेळ जाईल. संस्थेच्या वेबसाइटवर तो टाकलेला आहे कोणाला काही त्यामध्ये आणखी नोंद घ्यायची असेल काही प्रश्न विचारायचे असतील ते तुम्ही नंतर हे विचारू शकता कारण मला वाटतं लिंक दोन वाजेपर्यंतच आपल्याला अवेलेबल आहे. त्यामुळे वेळेचे भान ठेवून आपल्याला सगळे पुढील उर्वरित विषय घ्यायचे आहेत. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी. मला सांगण्यात आले आहे की लिंक दोन वाजेपर्यंत ॲक्टिव्ह राहील दोन ते हार्डली दहा मिनिटं हा ग्रेस पिरेड. तोपर्यंत आपल्याला सर्व सभासदांचे विषय अधिक जे काही सभासदांनी प्रश्न विचारले आधी लेखी विचारले त्या प्रश्नांची पण उत्तरे दिली जातील.दोष दुरुस्ती अहवाल या विषयावर सूचक आणि अनुमोदक द्यावे.

चर्चे अंती विषय क्र.6 पास करण्यात आला व त्यानुसार ठराव करण्यात आला

**ठराव क्र.6: ठराव पास करण्यात आला सन 2018-19याआर्थिक वर्षाचे हिशोब तपासणी अहवाल व त्यासंबंधीचा सहकार विभागाकडे सादर केलेला दोष दुरुस्ती अहवाल सभेत सादर केला असता सभागृहाने या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेऊन सर्वानुमते मंजूर केला.**

**सूचकः श्री श्रीधरन**

**अनुमोदकः श्री यदुवीर सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

श्री यदुवीर सिंग- धन्यवाद सर मला बोलायला संधी दिल्याबद्दल. मी खूप वेळापासून हात उचलून होतो पण मला चान्स मिळालेला नाही. आता मला चान्स देण्यासाठी मी तुमचे धन्यवाद मानतो. मला मागच्या दोन मुद्द्यांवर बोलायचं होतं पण त्याचे सूचक आणि अनुमोदक झालेले आहे. ही चांगली गोष्ट आहे. मला सांगायचे होते की बऱ्याच वर्षापासून आपला प्रॉफिट दहा कोटीच्या वर जात आहे. संचालक मंडळाचे अभिनंदन आहे. त्यांनी ज्या प्रकारे काम केलं आणि माझी इच्छा आहे प्रॉफिट मधून सभासदांचे व्याज कमी व्हावे आणि जो इंट्रेस्ट आहे इन्व्हेस्टमेंट वरील त्याचे व्याज वाढवले पाहिजे. हा जो प्रॉफिट आहे त्याला वाईट नजर लागू नये म्हणून संचालक मंडळाला माझी विनंती आहे की त्यांनी कर्जावरील व्याज कमी करावे म्हणजे हे प्रॉफिट कमी होईल.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- धन्यवाद यदुवीरजी तुमच्या सूचनेची नोंद घेतली गेली आहे.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- यदुवीरजी तुम्ही जो प्रस्ताव मांडला आहे की रेट ऑफ इंटरेस्ट कमी करणे त्याचे आम्ही स्वागत करतो. या कमिटीने जो पण प्रॉफिट होत आहे तो सभासदांमध्ये जास्तीत जास्त वाटलेला आहे. आम्ही सर्व कर्जाचे अर्ज फ्री केले आहेत, स्टेशनरी फ्री केली आहे. पुढे येणाऱ्या काळात निश्चित रूपाने आम्ही जे लोन वाटप आहे त्याचा रेट ऑफ इंटरेस्ट कमी करू आणि सभासदांना जास्तीत जास्त राहत देऊ. याआधी विशेष कर्जाचा व्याजदर 12.5% होता तो आम्ही 10% आणि 10.5%पर्यंत घेऊन आलो आहोत. इमर्जन्सी लोनपण मागील पाच वर्षे बघा आणि आत्ताच बघा. लोन रेट ऑफ इंटरेस्ट येणाऱ्या काळात निश्चित रूपाने कमी करू हे पूर्ण कमिटीच्या वतीने मी तुम्हाला वचन देतो.

श्री यदुवीर सिंग- मला आणखी एका गोष्टीवरून आपले अभिनंदन करायचे आहे.वजरेकरसरांचे मार्गदर्शन आणि तुमच्या संचालक मंडळाचे कामकाज अभिनंदनास पात्र आहे. कारण मागच्या टममध्ये कोणीही लोन घ्यायला जायचे तर असे वाटायचे कि कोणा सावकाराकडे जात आहोत. आज या, उद्या या, एक महिन्यानंतर या, असे सांगितले जायचे. तुम्ही खूप चांगल्या प्रकारे कारभार सांभाळून काम केले आहे. अभिनंदनास पात्र आहात तुम्ही. धन्यवाद तुम्हा सर्वांना.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-धन्यवाद. आता जी उपविधी दुरुस्ती आहे त्यासाठी आपण सर्वांचे मत घेऊ. या विषयावर काही लेखी प्रश्न असतील त्या संदर्भात काही पत्र आहेत का आली असतील तर ती वाचून दाखवा आणि सभासदांचे म्हणणे असेल ते ऐकून घ्या.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे यांनी विषय क्रमांक 7 वाचून दाखवला व याला मंजुरी देण्यात यावी अशी सभासदांना विंनती केली.

**विषय क्रमांक 7 संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस (परिशिष्ट 'अ' मध्ये दिल्याप्रमाणे) मंजुरी देणे.**

श्री प्रभात सिंग- सर मी तुम्हाला सॅल्यूट करतो की माझी खूप दिवसांची इच्छा होती की ही मिटिंग तुम्ही चालवावी. दरवेळी सभासद मीटिंग चालवत होते पण यावेळी मीटिंग तुमच्या हातात आहे आणि तुम्ही खूप चांगल्या प्रकारे चालवत आहात. संचालक मंडळाने मागच्या लॉकडाउनमध्ये सभासदांना जी सेवा दिली केली ती स्तुत्यपात्र आहे, स्पृहणीय आहे आणि आता तुम्ही जे शेअर्सचे 15,000 वरून 30,000 करणार आहात ते 50,000 का करत नाही. ते तुम्ही जास्त करू शकता. आपल्याकडे बचत खूपच चांगल्या प्रकारे होत आहे. म्हणून आपण हे करू शकता.
संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- तुमच्या सूचनेचे स्वागत आहे. येणाऱ्या काळात निश्चित रूपाने आम्ही या विषयावर विचार करू.

श्री प्रभात सिंग - तुम्ही बोलता की आम्ही लोनवरील  व्याज चांगल्या प्रकारे खाली घेऊन आलो पण तुम्ही ऑर्डीनरी लोनचा व्याजदर कमी करू शकू नाहीत का. त्यावर पण थोडं तुम्हाला काम करायच आहे.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- प्रभात सिंग सर तुमचं स्वागत आहे. येणाऱ्या काळात,ऑर्डीनरी लोन ज्या व्याजदराने दिले जात आहे त्याचा रेट ऑफ इंटरेस्ट आम्ही निश्चित रूपाने कमी करू.

श्री प्रभात सिंग - दुसरं असं आहे की जे डिपॉझिटवर व्याजदर आहेत त्यांच्यावर पण व्याजदर वाढवला पाहिजे.

**संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर**-ठीक आहे धन्यवाद.

श्रीराम परब- नमस्कार. अध्यक्ष साहेब सर्वांना माझी विनंती आहे कि श्री शिवाजी हगवणेआणि सारंग यांना दोन दोन मिनिटे बोलण्याची परत संधी द्या एवढी माझी विनंती आहे.

**संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर**-तुम्हाला उपविधी बद्दल काही बोलायचं आहे का.

श्री राम परब- नाही आमचे काही प्रश्न होते साउथ साईड बद्दल, ते मांडायचे होते. ते शिवाजी हगवणे यांच्याकडे आहेत त्यांना बोलण्याची संधी द्यावी.

श्री शेळके- आपली मीटिंग सेन्ट्रल कॉम्प्लेक्सला होते त्यापेक्षा शंभर पटीने चांगली मीटिंग इथे होत आहे असं मला वाटतं. कारण तुम्हाला ज्याच्याशी बोलायचे आहे त्यालाच तुम्ही बोलायला देता. मी दीड तास झाला हात वर करतोय आणि तुमची आता इच्छा झाली ती कोणी तरी बोलावं म्हणून मला आता संधी दिली असं वाटायला लागल.

**संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर**-असं काही नाही. येथे सर्वजण लाईनवर आहेत.

श्री शेळके - माझा मुख्य मुद्दा सांगतो आपल्या संस्थेमध्ये मी एक इन्वेस्टर आहे. माझ्या सारखे भरपूर इन्वेस्टर आहेत ते इन्वेस्ट करतात आपल्या एफडीमध्ये आणि त्याचा वापर आपण करतो लोन देण्यासाठी. आता काही नवीन नियम काढले आहेत सोसायटीमध्ये, एक एफडी करावी 2 एफडी करू नये.1लाख रुपयासाठी एकच चेक भरा. मला एक लाख रुपयांची रक्कम इन्वेस्ट करायची आहे आणि मला पुढच्या महिन्यात दहा हजार काढायचे असतील तर वीस हजाराच्या पाच किंवा पन्नास हजाराच्या दोन रिसीट मी करू शकतो, परंतु मला सांगितलं गेलं की तुम्ही एक लाखाची एकच एफडी करा आणि अशा काही कारणामुळे आमच्याएफडीवर तुम्ही बंधन लावले गेले. दुसरा प्रश्न एक इन्वेस्टर म्हणून आपल्याला विचारतो की आपल्याकडे जे BARCमधले सभासद आहेत ते बऱ्यापैकी गुंतवणूक करतात त्यासाठी सवलत दिली पाहिजे. इन्व्हेस्ट करताना आम्हाला वेगवेगळ्या अटींना सामोरे जावे लागते. मला 1 लाखाची एफडीकरायची असेल तर मला पूर्ण एक लाखाची रिसीट घ्यावी लागते. मी सांगतो की चार पावत्या बनवा किंवा दोन पावत्या बनवा कारण गरज लागली तर मला पूर्ण एक लाखाची एफडी मोडावी लागते आणि इन्वेस्टरसाठी काहीतरी नवीन स्कीम काढली पाहिजे असे माझे निवेदन आहे.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- शेळके साहेब काही सभासद एक लाख रुपये गुंतवणूक करतात आणि पाच हजाराच्या वीस रिसिप्ट मागतात. खरंतर चेक एकच असतो, त्याचं नाव एक असतं, मेंबर्शिप नंबर एक असतो, अशा या इन्कम टॅक्स स्क्रुटीनी मध्ये केस असल्यामुळे या सगळ्या गोष्टी इन्कम टॅक्सकडे याची नोंद घेतलेली आहे. आपल्या सभासदाचे भाग्य आहे की आपला आधार कार्ड किंवा पॅन कार्ड लिंक नाही इन्कम टॅक्सला. नाहीतर सगळ्या सभासदांना ते हानिकारक आहे म्हणून. ठीक आहे एक लाखांची गुंतवणूक असेल तर जास्तीत जास्त दोन रिसिप्ट घ्या प्रत्येकी पन्नास हजाराच्या, परंतु काही सभासद अशी मागणी करतात की मी एक लाखांची गुंतवणूक

केलेली आहे मला पाच हजाराच्या वीस रिसिप्ट द्या मी पाच लाख गुंतवलेले आहेत मला दहा हजाराच्या पन्नास रिसिप्ट द्या तर ते संस्थेच्या लेवलला शक्य नाही कारण आम्ही जी काळजी घेतो ती प्रत्येक सभासदाची काळजी घेतोय जेणेकरून भविष्यात आम्हाला, या संस्थेच्या भागधारकांना अडचणीला सामोरे जाता कामा नये. यासाठी आम्ही काळजी घेतलेली आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- अधिकृत भागभांडवल बाबत उपविधी दुरुस्ती क्रमांक क 1.3 त्याला सूचक आणि अनुमोदक द्यावे अशी मी विनंती करतो.

**ठराव क्र .7.1:ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. क 1.3 अधिकृत भाग भांडवल: संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये 100,00,00,000/- (अक्षरी रुपये शंभर कोटी फक्त) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु.1000/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) राहील. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 28 मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता येतील. सहकार वर्षात वर्गणीच्या रुपाने सभासदाकडून जमा केलेली रक्कम पुढील सहकारी वर्षाच्या पहिल्या दिवसाला म्हणजे 1 एप्रिलला सभासदाच्या भागभांडवलात जमा केली जाईल. भागवाटपाच्या नोंदी भागरजिस्टरला तसेच सभासदाच्या पासबुकमध्ये केल्या जातील. ही पध्दत सभासदाच्या भागभांडवलाची रक्कम रु.30,000/- (रुपये तीस हजार) होईपर्यंत चालू राहील (1000 रुपयाचे 30 भाग). वरील रकमेपेक्षा जास्त स्विकारण्यात आलेली रक्कम सभासदाच्या सभासद वर्गणीच्या खात्यात जमा करण्यात येईल व मंजुरीने सदर व्याज दिले जाईल. व्याजाचा दर सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पाहिजे. या उपविधी दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावास सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.**

**सुचक श्री प्रभात सिंग**

**अनुमोदक श्री पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

श्री सारंग - धन्यवाद मला पुन्हा बोलायला संधी दिल्याबद्दल. आपला ऑडिट रिपोर्ट तुम्ही पारीत केलात त्यानंतर ऑडिटर नियुक्ती केली यामध्ये मला एकच विचारायच आहे की ऑडिटर ए ग्रेड चे आहेत का.

संस्थेचे मानद सचिव संजय गावंडे-आहेत.

श्री सारंग - दुसरा प्रश्न आहे की व्हेइकल डेप्रिसिएशन ज्यावर राजापुरे बोलले आपलं डेप्रिसिएशन फायनान्शिअलसाठी होतं की ते महिन्यासाठी असतं.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे-डेप्रिसिएशन हे फायनान्शिअल वर्षासाठी होतं.

श्री सारंग- बरोबर आहे तुम्ही सहा महिन्याचा कालावधी बघा तो कुठेतरी मिस्मॅच होतोय डेप्रिसिएशन असतं ते प्रत्येक वर्षी वाढत असतं पहिल्या वर्षीचे डेप्रिसिएशन आहे ते 7 वरून 7.5% टक्के आणि दुसऱ्या वर्षात डेप्रिसिएशन आपलं 15% आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे-डेप्रिसिएशन आहे ते नियमानुसार घेतो आणि त्याला ऑडिटरची मान्यता आहे. त्यानुसार ऑडिटरच्या मान्यतेनुसार आपण त्याचे डेप्रिसिएशन घेतो.

श्री सारंग- मोटर व्हेइकल अ‍ॅक्टप्रमाणे डेप्रिसिएशन पहिल्या वर्षी जास्त असतं.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-तुम्हाला उपविधी बद्दल काही बोलायचे आहे का.

श्री सारंग- आता आपण जे लोन वाढवतोय आपण जे व्याज दर आकारत आहोत त्याबद्दल आपण बोलूया. या ठिकाणी व्याजदर ऑर्डीनरी लोन आणि स्पेशल लोन आहे त्यात ऑर्डिनरी लोनचा व्याज दर थोडा कमी करायला पाहिजे. कारण आपण ऑर्डीनरी लोनचं लिमिट वाढवतो आहोत तर आपल्याला व्याजदर कमी करावा लागेल कारण आपली मिळकत जी आहे ती वाढत चाललेली आहे म्हणून आपल्याला व्याजदर कमी करायला लागेल.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- यासंदर्भात संचालक मंडळाच्या वतीने पूर्ण विश्वास दिलेला आहे की पूर्वी किती व्याजदर होते ते आता किती आहेत आणि निश्चितच कबूल केलेले आहे या विद्यमान कार्यकारिणीने भविष्यामध्ये सर्वसाधारण कर्ज आहे त्याचे व्याजदर निश्चितच कमी केले जातील.

श्री सारंग- भविष्यात करण्यापेक्षा तुम्ही आता नमूद करा की.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- एक लक्षात घ्या, हे बालगोपाळ मंडळ नाही. उपविधी मंजूर झाल्यानंतर हे संपूर्ण विषय अजेंडावर घेतली जातात आणि मग अंमलबजावणी होते. तुम्ही जर आत्ताच सांगत असाल की आता इथे जाहीर करा तर ते कायद्याला धरून होत नाही आणि या बाबतीत विद्यमान कार्यकारिणीने सभासदांना जेव्हा यदुवोर सिंग यांनी प्रश्न विचारला तेव्हा आश्वासन दिल आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- उपविधी क्रमांक 1.10 ला सूचक आणि अनुमोदक द्यावे.

**ठराव क्र.7.2: ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 1) सर्वसाधारण कर्ज अ) मुदतकर्ज i) कर्जमर्यादा - मुदतकर्जाची जास्तीत जास्त मर्यादा रु.5,00,000/- किंवा जमा भागभांडवल अधिक वर्गणी याच्या 4 पट किंवा मासिक वेतनाच्या 15 पट किंवा प्रतीवर्ष पूर्ण सभासदत्वास पहिल्या 5 वर्षासाठी प्रतीवर्ष रु.60,000/- व 6 वर्षे पूर्ण सभासदत्वास त्याची वेतन क्षमता पाहून जास्तीत जास्त रु.5,00,000/- एवढे कर्ज मंजूर करणे. यापैकी जी कमीत कमी रक्कम असेल ती रक्कम वेळोवेळी मा. सहकार आयुक्त यांच्या कर्जवाटप धोरणाच्या परिपत्रकानुसार व संचालक मंडळाने घालून दिलेल्या मर्यादेस अनुसरुन कर्ज म्हणून मंजूर केली जाईल. मात्र वाढीव कर्जाची अंमलबजावणी उपलब्ध निधी लक्षात घेऊन केली जाईल. या उपविधी दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावास सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.**

**सुचक डॉ. विजय अहेर**
**अनुमोदक श्री व्ही. आर. लोखंडे**
**ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

श्री कुरूप- खूप वेळा पासून मी वाट बघतोय मला बोलायची संधी केव्हा मिळेल. मला संधी दिल्याबद्दल धन्यवाद. अमेंडमेंट बद्दल माझे तीन प्रश्न आहेत पहिला प्रश्न आपले शेअर कॅपिटल आहे ते खूप चांगले आहे. खूप

दिवसापासून आम्हाला चिंता होती पण आपल्या कमिटीने खूप चांगलं काम केलं आणि ऑर्डीनरी लोन तीन वर्षापासून आम्ही मागणी केली होती 2.5 वरून 5 लाख करा त्यासाठी मी विद्यमान कमिटीला धन्यवाद देतो. पण मला स्पेशल लोन विषयावर प्रश्न विचारायचा आहे आत्ता स्पेशल लोन 22 लाख आहे, नवीन उपविधी दुरुस्तीप्रमाणे ते 50 लाख करण्यात येणार आहे. आणि स्पेशल लोनचे इन्शुरन्स प्रोव्हिजन तुम्ही 12 लाखापर्यंत केलेले आहे तर लोन वाढल्यानंतर त्याचे इन्शुरन्स प्रोविजन वाढवू शकता का. त्याला 0.5% इंटरेस्ट वाढवून त्याचे इन्शुरन्स तुम्ही देऊ शकता का. माझा दुसरा प्रश्न असा आहे की शुअरिटीच्या बाबतीत. सध्या शुअरिटी मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे स्पेशल लोनला इन्शुरन्स देण्याची विनंती मी करत आहे. माझ्या या विनंतीचा कमिटी मेंबर विचार करू शकतात का. हे माझे तीन प्रश्न आहेत.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- कुरूपजी आता तुम्ही जी सूचना दिली त्याबाबतीत स्पेशल लोन आम्ही 50लाख करत आहोत आणि त्या लोनला आम्ही इन्शुरन्स देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत ते कशा प्रकारे देऊ शकतो याबद्दल आमच्या संचालक मंडळामध्ये चर्चा सुरू आहे परंतु आत्ता आम्ही त्याबद्दल काही सांगू शकत नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की आम्ही स्पेशल लोन 50 लाख केले याचा अर्थ असा नाही की सर्व सभासदांना ते मिळणार ज्यांची पेइंग जेवढी असेल तेवढेच कर्ज त्याला मिळणार आणि जास्तीत जास्त 50 लाख आहे.

श्री कुरूप- सर हे माहित आहे. फक्त 40% सभासदांनाच स्पेशल लोन 50 लाख मिळेल पण विषय तो नाही. जे 60%सभासद आहेत ज्यांना 22 ते 25 लाख कर्ज मिळू शकतो त्यांच्या 25 लाखापर्यंच्या विशेष कर्जाला इन्शुरन्स करू शकता का.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आम्ही प्रयत्न करत आहोत. इन्शुरन्स कंपनी बरोबरआमची चर्चा सुरू आहे आणि लवकरात लवकर हा प्रस्ताव इम्प्लिमेंट करू शकतो.

श्री कुरूप- सर मला स्पेशल लोनच्या व्याज दराबद्दल बोलायचं आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- रेट ऑफ इंटरेस्ट बद्दल नंतर निर्णय घेण्यात येईल. आता आपल्याला अमेंडमेंट बद्दल बोलायचं आहे अमेंडमेंट पास झाल्यानंतर पुणे को-ऑप.कमिशनर कडे मंजुरीसाठी पाठवले जाते आणि तेथे मंजुरी मिळाल्यानंतर मॅनेजिंग कमिटीच्या अंडर डिसिजन घेऊ शकतो. ते डिसिजन आम्ही नंतर घेऊ. सध्या अमेंडमेंट ठेवली आहे.

**ठराव क्र.7.3: ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 1) सर्वसाधारण कर्ज अ) मुदतकर्ज ii) दिवसनिहाय/दिवसागणिक व्याज गणना- सभासदाने घेतलेल्या कर्जावरील व्याज हे दिवसनिहाय / दिवसागणिक शिल्लक असलेल्या कर्ज रकमेवर त्या महिन्याच्या प्रत्येक दिवसाच्या कर्ज रकमेची गुणक(products)पध्द्तीने शिल्लक घेऊन व्याज आकारणी केली जाईल. व्याजदर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीकडे राखीव राहील. या उपविधी दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावास सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.**

**सुचक श्री बी. डी. शिंदे**
**अनुमोदक श्री केविन**
**ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

श्री संजय कुमार, नरोरा- नमस्कार सर. मी दोन वर्षापासून प्रयत्न करत होतो एजीएमला येण्याचा परंतु येऊ शकलो नाही. या करोनाच्या काळात ऑनलाईन मीटिंग केल्यामुळे मला ही मीटिंग अटेंड करता आली. त्याबद्दल तुमचे धन्यवाद. आम्ही 450पर्यंत सभासद नरोरा येथे आहोत आणि त्यांचे प्रतिनिधित्व मी करतो. तुम्ही जे काम केले आहे ते खूपच अभिनंदनास पात्र आहे कारण करोनाच्या काळात अशी सेवा देणे शक्य नाही पण ती आम्हाला तुमच्याकडून मिळाली. लोन मिळण्यासाठी खूपच चांगली प्रोसेस आहे कारण सभासद बँकांना सोडून आपल्या सोसायटीकडे कर्जासाठी येत आहे. जास्तीत जास्त सभासद माझ्याशी कॉन्टॅक्ट करतात त्यांना मी जेवढी मदत करता येईल तेवढी करतो. ही खूप चांगली गोष्ट आहे की खूप कमी वेळात त्या सभासदांना लोन मिळून त्यांच्या बँक अकाउंट मध्ये रक्कम जमा होते. त्यामुळे त्यांची काम लवकर होतात जे बँकेचे लोन काढण्यात होत नाही. म्हणून मी तुम्हा सर्वांचे कमिटीमेंबचे अभिनंदन करत आहे. त्याच बरोबर जेवढे पण इन्व्हेस्टमेंट आहे त्या सुद्धा खूप चांगल्या आहेत. आम्ही सर्वजण नरोरामध्ये आहोत मुंबईपासून खूप लांब आहोत. म्हणून आम्हाला थोडी अडचण येते की जे पोस्टेज आहे आम्हाला मिळत नाही आणि प्रिंटिंगची अडचण आहे म्हणून मला असं वाटतं की येथील सर्व सभासदांची अशी इच्छा आहे की ऑनलाईन मध्ये त्यांचे जे पण लोन सुरू आहे ते त्यांना मिळाले पाहिजे सारखं सारखं फोन करून विचारावं लागतं म्हणून जर आम्हाला सॉफ्ट कॉपी मध्ये जर काही भेटलं किंवा ऑनलाईन मिळालं किंवा इथे तसं काही करू शकलात तर येथील 450 सभासदांना त्याचा फायदा होईल. जर मला असं ACCESSमिळालं PASSWORD मिळाला तर मी त्यांना मदत करू शकतो. त्याचबरोबर आपण ऑनलाईन मध्ये सॉफ्टवेअर जे दिला आहे ते खूप चांगले आहे पण जे सॉफ्टवेअर आहे त्यामध्ये थोडे थोडे रिपिटेशन होत आहे काही वेळा त्याच्यात सभासदाचे नाव येते जे EXPIRED झालेले आहेत. दुसरी गोष्ट अशी की सभासद EXPIRED झाले तरी त्यांचे इन्शुरन्स ऑटो मध्ये गेले पाहिजे त्यांना कोणता फॉर्म वगैरे भरून द्यायची गरज पडली नाही पाहिजे कारण सर्व डाटा तुमच्याकडे असतो. कमीतकमी इन्शुरन्स पैसे जर त्यांच्याकडे त्यांच्या नोमिनेचे पैसे येतील ते ठीक आहे पण इन्शुरन्सचे पैसे जर का त्यांना मिळाले तर त्याला खूपच रिलीफ मिळेल. आमच्याकडे आता पाच ते सहा सभासद EXPIRED झालेले आहेत त्यांची सर्व माहिती मी सतत ऑनलाइन पाठवतो ज्या दिवशी जो मेंबर EXPIREDहोतो त्या दिवशी मी माहिती देतो. मला असं वाटतं की डेथ केसबद्दल आपण जास्त लक्ष घातले पाहिजे. माझ्यासाठी खूप फायदा होईल कारण सर्वजण माझ्याशी कॉन्टॅक्ट करतात यामध्ये जो लोन घेतो त्याचं रेडी रेकनर नाही आमच्याकडे लोनची पुढची रक्कम काय असेल, ते माहिती घेऊ इच्छितात की रेडीरेकनर सर्व ठिकाणी असतो की त्यामध्ये तुम्ही तुमची रक्कम टाकली तर तुम्हाला ईएमआय समजणार की तो किती असेल तर हे कॅलक्युलेटर जर आम्हाला ऑनलाइन मध्ये मिळालं किंवा कसा पण करून मिळालं तर ते मी सर्व लोकांना देऊ शकतो. तुमची जेवढी पण माहिती मी कुठूनही मिळवून सभासदांना देतो. तुम्ही जे काही करता ते खूप चांगला आहे त्यात कसलीच अडचण

नाही. पण कधी कधी मला असं होतं की कॉन्टॅक्ट होत नाही त्यासाठी मी श्री सोनी साहेबांना खूप धन्यवाद देतो की सोनी सर आमच्याशी जोडलेले आहेत. म्हणून माझी कोणतीही अडचण दूर होते म्हणून मला असं वाटतं की तुम्ही हे एवढं चांगलं काम करत आहात आणखी चांगलं काम करा ती जीपण सॉफ्ट कॉपी आहे ती आम्हाला ऑनलाईन भेटेल किंवा पीडीएफ मध्ये भेटेल असे करावे. इथे 450 सभासद आहेत आणि नवीन सभासद सुद्धा जॉईन होऊ इच्छित आहेत. पण त्यांना जोपर्यंत तुमच्या बाबतीत सांगणार तेव्हाच ते जॉईन होतात मला त्याबद्दल त्यांचा क्लास घ्यावा लागतो. त्यांना सर्व सांगावा लागतो म्हणून मी असं म्हणतो की मला थोडीशी माहिती भेटली की तुमचा रेडीरेकनर हा आहे तुम्हाला एवढा मिळणार असं तुम्हाला मिळणार आता पण सभासद खुश आहेत. माझ्याकडे येतात त्यांच्या अडचणी घेऊन आणि मी तुमच्याशी बोलून ते सॉल्व्ह करतो. आभारी आहे. धन्यवाद.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- संजय कुमारजी तुमचे खूप खूप धन्यवाद. तुम्ही आमच्या संचालक मंडळाच्या कामाला पसंत केलं त्याबद्दल तुमचे धन्यवाद. तुम्ही ज्या दोन-तीन सूचना केल्या आहेत की तुम्हाला ज्या सुविधा मिळतात त्यात पोस्टेज आणि इतर बाबतीत अडचण येत आहे तर आपण थोड्याच दिवसात एक मोबाईल ॲप अशी सुविधा देणार आहोत. त्यामध्ये तुम्हाला सर्व गोष्टी मिळतील डेली डेटा मिळणार, तुमचं डेली ट्रांजेक्शन आणि इतर जे काही असेल ते सर्व यामध्ये असेल. या ॲपमध्ये तुमचा मेंबर्शिप नंबर टाकल्यानंतर तुम्हाला सर्व समजेल की तुमचा लोन बॅलन्स किती, तुमची इन्वेस्टमेंट किती, ते सर्व मिळणार. पण त्यासाठी थोडा वेळ लागेल दोन तीन महिन्यानंतर हे शक्य होईल बाकी जो काही तुमचा प्रश्न आहे रेडीरेकनर जे त्यात नाही ते पण आम्ही ॲप वर टाकण्याचा प्रयत्न करू. हे सर्व आम्ही शक्य तितक्या लवकर करण्याचा प्रयत्न करू आणि तुम्ही जे प्रश्न उपस्थित केले ते तडीस नेण्याचा प्रयत्न करू. तुम्हाला एक विनंती आहे की या अमेंडमेंटला तुम्ही अनुमोदन द्यावे.

श्री बागवे- नमस्कार सर. मॅनेजिंग कमिटीचे हार्दिक अभिनंदन.त्यांनी खूपच चांगल्या प्रकारे काम त्यांनी केले आहे. वजरेकर सरांच्या मार्गदर्शनामुळे मध्ये आता जे अमेंडमेंट आणले आहे 1.10 त्याला माझे अनुमोदन आहे आणि त्याचा जो इंट्रेस्ट आहे तो कमी करण्यात यावा यासाठी मॅनेजिंग कमिटीने प्रयत्न करावेत ही विनंती.

श्री रोहरा- नमस्कार साहेब. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद. माझं या अमेंडमेंटला पूर्ण अनुमोदन आहे कारण हे आजच्या वेळेची गरज आहे.

**ठराव क्र.7.4 ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 1) सर्वसाधारण कर्ज ब) दीर्घमुदतकर्ज i) कर्जमर्यादा - दीर्घ मुदत कर्जाची जास्तीत जास्त मर्यादा रु.50,00,000/- किंवा जमा भागभांडवल अधिक वर्गणी याच्या 16 पट किंवा मासिक वेतनाच्या 30 पट किंवा प्रतीवर्ष पूर्ण सभासदत्वास पहिल्या 5 वर्षासाठी प्रतीवर्ष रु. 5,00,000/- व 6 वर्षे पूर्ण सभासदत्वास त्याची वेतन क्षमता पाहून जास्तीत जास्त रु.50 लाख एवढे कर्ज मंजुर करणे. यापैकी जी कमीत कमी रक्कम असेल ती रक्कम वेळोवेळी मा. सहकार आयुक्त यांच्या कर्जवाटप धोरणाच्या परिपत्रकानुसार व संचालक मंडळाने घालून दिलेल्या मर्यादेस अनुसरुन कर्ज म्हणून मंजूर केली जाईल. मात्र वाढीव कर्जाची अंमलबजावणी उपलब्ध निधी लक्षात घेऊन**

**केली जाईल. मात्र वाढीव कर्जाची अंमलबजावणी उपलब्ध निधी लक्षात घेऊन केली जाईल. या उपविधी दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावास सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.**

**सुचक श्री भरत रोहरा**

**अनुमोदक श्री अशोक कुमार सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

श्री अशोक कुमार- सर माझी एक विनंती आहे छोटीशी. कारण मला खूप त्रास झाला या गोष्टीचा. माझे जामीनदार होते श्री आर के सिंग जे ध्रुवामध्ये काम करत होते. ते गेल्या वर्षी दिवंगत झाले. त्यानंतर मला त्याच दिवशी तीन माणसांचा निरोप आला की तुम्हाला तुमची शुअरिटी बदलावी लागेल. मी खूपच निराश झालो. कारण ते माझे रिलेटिव्ह होते आणि त्यांच्या सर्व कामात मी गुंतलो होतो आणि मला तीन जणांचे मेसेज आले की तुम्ही तुमची शुअरिटी बदला त्याच दिवशी ज्या दिवशी ते दिवंगत झाले. म्हणून तुम्ही ही गोष्ट नोट करावी जर अशी काही गोष्ट झाली तर 15 ते 20 दिवस तुम्ही थांबा आणि मगच जामीनदार बदलण्याबद्दल त्याच्याशी बोला.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- संस्थेकडून अशा प्रकारचा मेसेज जाणं शक्य नाही.

श्री अशोक कुमार- साहेब पैसे सर्व भेटले त्याची गोष्ट नाही.शुअरिटी दिवंगत झाल्यानंतर त्याच दिवशी मला मेसेज येतो की तुम्ही नवीन शुअरिटी द्या याबाबत मी बोलत आहे.अशी गोष्ट झाली नाही पाहिजे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- हे पहा अशी गोष्ट होऊ शकत नाही. तरी सुद्धा झाली असेल तर याबाबत चौकशी केली जाईल.

श्री अशोक कुमार- डी.ए.ई.मधील जे पालांडे येतात सोसायटीमध्ये कामानिमित्त त्यांच्याकडून मला हा निरोप मिळाला

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- ठीक आहे पालांडे हे फक्त मेंबर आहेत. पण आंम्हाला माहिती नसताना जर ते तुम्हाला मेसेज देतात तर त्याची जबाबदारी आमची नाही.

श्री अशोक कुमार- सर सोसायटीमधूनच कोणीतरी त्यांना सांगितलं असेल.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- असं होऊ शकत नाही.पालांडेनी स्वतः तो मेसेज तुम्हाला सांगितला असेल.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- आम्ही सहा महिने रिमाइंडर पाठवतो. त्यानंतर तीन महिन्यांनी ॲक्शन घेतो त्याआधी आम्ही कोणालाही मेसेज देत नाही.

श्री अशोक कुमार- सोनी सर येथे आहेत तुम्ही त्यांना विचारा मी कधी चुकीचे बोलतो का.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- तुम्ही चुकीचं बोलत नाही तुम्ही फक्त आमच्या नजरेस आणून देत आहात की काय झालं. त्यावर आम्ही चौकशी करू, परंतु सोसायटीमधून कोणालाही असा मेसेज जात नाही. आम्ही

सहा सहा महिने थांबतो जे सभासद दिवंगत होतात त्यांच्या फॅमिलीबरोबर सोसायटी असते आणि ऑफिसकडून किंवा आपले जे कर्मचारी आहेत त्यांच्याकडूनही अशी कोणतीही गोष्ट झाली नसणार.

श्री अशोक कुमार- सोसायटीमधूनच कोणीतरी सांगितलं आणि मग मला पालांडेनी येऊन सांगितलं. ही गोष्ट तुम्ही त्यांना विचारू शकता.

श्री तिवारी- तुम्हा सर्वांना माझा नमस्कार आणि मॅनेजिंग कमिटीचे अभिनंदन. या कमिटीने खूपच चांगल्या प्रकारे काम केले आहे. मी डीसीएसईएममध्ये आहे.डीसीएसईएम, हेवी वॉटर बोर्ड, डी.ए.ई.च्या सभासदांसाठी तुम्ही मंदाकिनी ऑफिस सुरू केले. त्याचा खूप फायदा या सभासदांना होत आहे. त्याबद्दल खूप धन्यवाद. तुम्ही आज अमेंडमेंटचा विषय घेतला आहे त्याला माझे अनुमोदन आहे. त्यानंतर मला एक विषय बोलायचा आहे त्याबद्दल तुमची परवानगी आहे का.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- धन्यवाद तिवारी साहेब. तुम्ही संचालक मंडळाला पसंती दिली त्यासाठी तुमचे धन्यवाद आणि तुमच्या काही सूचना असतील तर त्याही सांगा.

श्री तिवारी- माझा एक प्रश्न आहे ही जी मिटिंग आहे त्याबद्दल. या मिटींगची सूचना सर्व सभासदांना मिळाली नाही की कोणता फॉर्म भरून द्यायचा, ऑनलाइन कसा भरायचा, काय करायचं,अनेक सभासद आहेत ज्यांना माहिती नाही की यासाठी फॉर्म कसा भरायचा तर त्या सभासदांसाठी कमिटी काही निर्णय घेईल तर चांगलं होईल.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- याबाबत हार्ड कॉपी दोन तारखेपासून बारा तारखे पर्यंत भरून घेतली त्यानंतर 15 तारखेपर्यंत त्यांचे फॉर्म आले. वीस-पंचवीस तारखेपर्यंत आम्ही ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची संधी सुविधा दिली होती. त्यानंतर आम्हाला पण लिमिटेशन्स आहेत. आता तुम्ही सूचना केली ते शक्य नाही. म्हणून आम्ही माफी मागतो पण आम्ही पूर्णवेळ दिला होता या मिटींगचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी.2 ते 25 तारखेपर्यंत रजिस्ट्रेशनसाठी वेळ दिला होता. त्यावर पण जर सभासदांनी मीटिंग अटेंड करण्यासाठी काही केलं असेल तर ते आत्ता शक्य नाही.

श्री तिवारी- तुमच्या मताशी मी पूर्ण सहमत आहे पण मला याबाबतीत आपत्ती आहे की सर्व सभासदांना या मीटिंगची माहिती मिळाली नाही.

श्री ढोबळे- प्रथमतः नमस्कार. मी सर्वांचे आभार मानतो. अभिनंदन करतो. आपण मागील पाच वर्षात खूप चांगली कामे केली, सराहनीय आहे, त्याबद्दल आभार. करोना काळात तुम्ही करून दाखवलं की बाहेरच्या बँका करू शकल्या नाहीत ते आपल्या सोसायटीने केले. त्याबद्दल अभिनंदन सर्वांचं आणि आभार. माझे अनुमोदन आहे या अमेंडमेंटला. बऱ्याच जणांनी प्रश्न उचलले आणि बरेचसे बोलून गेले व्याजदर कमी करावा वगैरे आणि मला निश्चितच वाटतं की तुम्ही व्याजदर कमी कराल. धन्यवाद. माझं पूर्ण अनुमोदन आहे तुम्हाला.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- धन्यवाद ढोबळे साहेब. तुम्ही आमच्या कामाबद्दल जो आनंद व्यक्त केला, कामाची प्रशंसा केली त्याबद्दल आपले खूप खूप धन्यवाद तसेच आपल्या सूचनेची नोंद घेतली आहे. आम्ही व्याजदर निश्चितच कमी करू अशी संचालक मंडळाच्या वतीने मी ग्वाही देतो.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- अमेंडमेंट वाचून दाखवली सभासदांना विनंती आहे त्यांनी या उपविधी दुरुस्तीसा सूचक आणि अनुमोदक द्यावे.

ठराव क्र.7.5: ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 1) सर्वसाधारण कर्ज ब) दीर्घमुदतकर्ज **ii)** दीर्घमुदतकर्ज **(**विशेषकर्ज**)-** दिवसनिहाय/दिवसागणिक व्याज गणना- सभासदाने घेतलेल्या कर्जावरीलव्याज हे दिवसनिहाय/दिवसागणिक शिल्लक असलेल्या कर्ज रकमेवर त्या महिन्याच्या प्रत्येक दिवसाच्या कर्ज रकमेची गुणक **(products)** पध्द्तीने शिल्लक घेऊन व्याज आकारणी केली जाईल. व्याजदर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीकडे राखीव राहील**.** परंतु कर्जावरील व्याजदर **(**ए**.**बी**.**आर**.)** अॅव्हरेज बॉरोईंगरेटपेक्षा जास्त व **1%** ते **3%** यांच्या दरम्यान राहील**.**

सुचक श्री राजेंद्र झाडे
अनुमोदक श्री डी. एस. राजापुरे
ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- अमेंडमेंट वाचून दाखवली सभासदांना विनंती आहे त्यांनी या उपविधी दुरुस्तीसा सूचक आणि अनुमोदक द्यावे.

**ठराव क्र.7.6:ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 3) आकस्मित कर्ज i) कर्जाची मर्यादा – आकस्मित कर्जाची जास्तीत जास्त मर्यादा रु.1,00,000/- किंवा जमा भागभांडवल अधिक वर्गणी याच्या 90% यापैकी जी कमीत कमी रक्कम असेल ती रक्कम जामिनदाराशिवाय किंवा मा. सहकार आयुक्त यांच्या कर्जवाटप धोरणाच्या परिपत्रकानुसार व संचालकमंडळाने घालून दिलेल्या मर्यादेस अनुसरुन कर्ज म्हणून मंजुर केली जाईल. मात्र वाढीव कर्जाची अंमलबजावणी उपलब्ध निधी लक्षात घेऊन केली जाईल. या उपविधी दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावास सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.**

**सुचक श्री हरिश्चंद्र तिवारी**
**अनुमोदक श्री पांडुरंग ढोबळे**
**ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

श्री भरत चौधरी- सर्वप्रथम मला तुमचे आभार मानायचे आहेत की तुम्ही मला बोलण्याची संधी दिली. दुसरी गोष्ट या संचालक मंडळाचे खूप खूप आभार मानतो की त्यांनी लॉकडाऊन मध्ये ज्या उद्देशाने काम केले, सभासदांना कोणताही त्रास होऊ दिला नाही त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार, मला फक्त एवढेच सांगायचे आहे की सगळ्या गोष्टीला जे काही उद्देश आहेत जे काही प्रश्न आहेत त्याबाबत या कार्यकारिणीने जे निर्णय घेतले त्याला माझे पूर्ण अनुमोदन आहे. या कार्यकारिणीने फक्त एकच केंद्रबिंदू ठेवला आहे तो केंद्रबिंदू असा आहे की प्रत्येक सभासदाचा कसा फायदा होईल हाच त्यांचा उद्देश आहे. हा उद्देश ठेवूनच ते काम करत आहेत.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- धन्यवाद चौधरी साहेब.

**ठराव क्र.7.7 ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 3) आकस्मित कर्ज iii) आकस्मित कर्ज व त्यावरील देय असलेले सरासरी व्याज जास्तीत जास्त समान 24 हप्त्यात दरमहा पगारातून कापले जाईल. या उपविधी दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावास सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.**

**सुचक श्री विजय शेळके**

**अनुमोदक श्री टी. बी. कुरूप**

**ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

**ठराव क्र.7.8 ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 3) आकस्मित कर्ज v) दिवसनिहाय/दिवसागणिक व्याज गणना- सभासदाने घेतलेल्या कर्जावरील व्याज हे दिवसनिहाय / दिवसा गणिक शिल्लक असलेल्या कर्जरकमेवर त्या महिन्याच्या प्रत्येक दिवसाच्या कर्जरकमेची गुणक (products) पध्द्तीने शिल्लक घेऊन व्याज आकारणी केली जाईल. व्याजदर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीकडे राखीव राहील.**

**सुचक श्री संजय कुमार (NAPP)**
**अनुमोदक श्री श्रीधरन ए.**
**ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

श्री शिंदे- उपस्थित सर्व संचालक मंडळाला आणि जे सभासद ऑनलाईन उपस्थित आहे त्या सर्वांना माझा मैत्रीपूर्ण नमस्कार करून आजच्या या सर्वसाधारण सभेमध्ये श्री वजरेकर साहेबांनी ज्या पद्धतीने अध्यक्षपदाची धुरा सांभाळली ती वाखाणण्याजोगी आहे. आणि प्रथमता DAE चा रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून मी सर्व संचालक मंडळाचे हार्दिक अभिनंदन करतो. प्रत्येक वेळी फक्त बीएआरसीचे सभासदच या सभेमध्ये सहभागी होतात व इतर कोणालाही बोलता येत नाही किंवा समोरच्याला ऐकायला येत नाही परंतु या ऑनलाईनच्या माध्यमातून या ठिकाणी मला सांगावसं वाटतं की नरोरा सारख्या ठिकाणाहून, इंदोर सारख्या ठिकाणाहून सभासद जॉईन झाले आहेत आणि तुम्ही अभिनंदनास पात्र आहात की जेणेकरून सोसायटीचे सभासद म्हणून तुम्ही सर्व प्रकारे त्यांची काळजी घेतलेली आहे ज्या पद्धतीने 5 वर्ष या कार्यकारिणीचा कार्यकाळ याठिकाणी संपन्न झालेला आहे मला वाटतं भविष्यकाळात हा कार्यकाळ सुरू राहिल पण एवढीच विनंती आहे की ज्या पद्धतीने काही सभासदांनी काही गोष्टी पॉईंट आऊट केलेले आहेत मग ते बजेटच्या बाबतीत असू दे किंवा वाहनाच्या बाबतीत असू दे काही गोष्टी नमूद झाल्या आहेत कळत नकळत सभासदांच्या मार्फत तर मला असं वाटतं या गोष्टीचा आपण कमिटी मेंबर म्हणून काळजीपूर्वक विचार करावा आणि ऑनलाईन मध्ये जेवढ्या जास्तीत जास्त सभासदांना सेवा देता येईल अशा पद्धतीने आपण ते कराल अशी

आमच्या सभासदांकडून अपेक्षा आहे. आपल्या ज्या काही मनीषा आहेत, अशा आकांक्षा आहेत सोसायटीच्या बाबतीत किंवा सोसायटीच्या सभासदांच्या उत्कर्षाच्या बाबतीत तर नक्कीच आपण पूर्ण कराल ही मंगल कामना या ठिकाणी व्यक्त करून आपल्या सर्वांचे मी पुन्हा एकदा अभिनंदन करतो. धन्यवाद.

श्री लोखंडे- सर तुम्ही जे स्पेशल लोन,ऑर्डीनरी लोन इमर्जन्सी लोन आहे त्यात स्पेशल लोनला12 लाखापर्यंत इन्शुरन्स केला आहे आणि त्याच्यावर जी रक्कम असेल त्याला इन्शुरन्स क्लेम होत नाही. जर एखादी व्यक्ती 14 लाखस्पेशल लोन घेत असेल तर त्यामध्ये तुम्ही 12 लाखापर्यंत क्लेम केलं तरी चालेल. सर जर पूर्ण रक्कम त्याला भरावी लागत असेल तर अडचण येईल. एखादी व्यक्ती दिवंगत झाल्यावर याविषयी काही केलं तर बरं होईल कारण त्याच्या कुटुंबावर हा बोजा येतो.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावडे- यापूर्वी लोनला कोणतही इन्शुरन्स नव्हतं पण आपण सभासदांच्या हिताच्या दृष्टिकोनातून बारा लाखापर्यंत इन्शुरन्स सोसायटी देते कारण त्याची आपल्याला ग्यारंटी आहे.जेव्हा आपण इन्शुरन्स कंपनीकडे जातो तेव्हा इन्शुरन्स कंपनी, सोसायटी आणि मेंबर या तीन गोष्टी येतात. जर आपण इन्शुरन्स केला आणि त्या कंपनीने इन्शुरन्स दिला नाही म्हणजे एखादा सभासद दुर्दैवाने दिवंगत झाला आणि जर ही लायबिलिटी आपण इन्शुरन्स कंपनीकडे घेऊन गेलो आणि त्यांनी नाही सांगितलं या कंडिशन फुल फील होत नाही असं सांगितलं तर या सर्व गोष्टींची जबाबदारी सोसायटीवर येते जी सोसायटीला घेता येणार नाही. त्यासाठी पूर्ण चर्चा करून याबाबत सभासदांसाठी चांगल्यातला चांगला मार्ग कसा निघेल, जास्तीत जास्त कर्जाला संरक्षण कसे मिळेल यासाठी आम्ही जास्तीत जास्त इन्शुरन्स कंपन्यांबरोबर चर्चा करून यामध्ये चांगल्या प्रकारचा इन्शुरन्स मिळविण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यामुळे याला वेळ लागत आहे. कारण की उद्या असं व्हायला नको इन्शुरन्स केला पण नंतर ती इन्शुरन्स कंपनी आम्हाला त्याचे पैसे देत नाही मग जर अशी स्थिती आली तर सभासद सोसायटीवर सोसायटीला नाव ठेवतील, की आम्ही तर सोसायटीच्या म्हणण्याप्रमाणे इन्शुरन्स केला मग आता आम्हाला इन्शुरन्स कंपनी इन्शुरन्स देत नाही. त्यामुळे आम्हाला या गोष्टीचा पूर्णपणे विचार करून ते फुलफिल केल्या पाहिजे आणि आम्ही ते करत आहोत. त्यासाठी याला वेळ लागत आहे. पण निश्चितच यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.आम्ही चांगली योजना आणू की जेणेकरून सभासदांना इन्शुरन्सबाबत अडचण येऊ नये. अडचण येऊन उपयोग नाही इन्शुरन्स करून उपयोग नाही त्याच्या अडचणी पण दूर व्हायला पाहिजे हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आम्ही जास्तीत जास्त अभ्यास करून त्याचे रिटन पॉईंट कन्सिडर करूनच इन्शुरन्स कंपनीसोबत करार करणार आहोत आणि संस्थेच्या पातळीवर जास्तीत जास्त 12 लाखाचे लोन संरक्षित करण्याचा प्रयत्न केला.ते सोसायटी लेवलवर पॉसिबल आहे पण याच्या पुढचं लोन संस्थेच्या पातळीवर करणे शक्य नाही त्याला इन्शुरन्स कंपनीद्वारा काहीतरी करावं लागेल. फक्त याबाबतीत कामकाज चालू आहे. या कर्ज संरक्षण निधीमधून दोनशे ते अडीचशे सभासदांना त्याचा फायदा झालेला आहे आणि सभासदांच्या ज्या शुअरिटीज आहेत आहेत त्यांना पण त्याचा रिलीफ मिळाला आहे आणि यासाठी जवळपास दोन कोटी पर्यंत आपण कर्ज संरक्षण निधी योजनेअंतर्गत कर्ज माफ केलेले आहे.

श्री लोखंडे- धन्यवाद साहेब. खूप चांगलं काम केले आहे. आम्ही खूप खूप शुभकामना देतो तुम्हाला. धन्यवाद.

डॉ.विजय आहेर- नमस्कार साहेब माझा एक प्रश्न आहे उपविधीवर ज्या चर्चा करत आहोत व्याजदर ठरवण्याचा विषय. संचालक मंडळाला व्याजदर ठरवण्याचा अधिकार देण्याबाबत बरोबर आहे का.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे-कर्जाचे व्याजदर ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळाला असेल असा आहे.

डॉ.विजय आहेर- मला अशी शंका आहे की उपविधी आणण्याचे कारण काय. म्हणजे आतापर्यंत आपण वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये व्याजदर ठरवत होतो.मग ही उपविधी आणण्याची गरज संचालक मंडळाला का भासली.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- कारण जेव्हा आपण सन 2015 मध्ये जेव्हा ही कार्यकारिणी आणि संचालक मंडळ आले त्यावेळी आपला जो बायलॉज होता त्यामध्ये प्रत्येक कर्जाचे व्याजदर दिले होते. विशेष कर्जाला मुंबई बँके पेक्षा 0.5% जास्त, इमर्जन्सी लोनला 12% अशी  बायलॉज मध्ये नोंद केली असल्यामुळे आपण ते व्याजदर कमी करणे शक्य असताना देखील सभासदांना 12.5%म्हणजे मुंबई बँकेच्या 0.5% जास्त दराने व्याज दिले गेले सभासदाची लूटच होत होती असं म्हणायला पाहिजे. जेव्हा आमच्या लक्षात आलं की आपण सभासदांना कमी व्याजदराने कर्ज देऊ शकतो त्यावेळी आम्हाला पहिल्यांदा बायलॉजी मध्ये चेंज करावे लागेल त्यानुसार आम्ही बदल केला आणि पहिल्यांदाच स्पेशल लोनच्या व्याजदरात बदल केला. आज आम्ही मुंबई बँक 9.9% दराने कर्ज असताना आम्ही 9.5%दराने कर्ज 12 लाखापर्यंत स्पेशल लोन देत आहोत.

डॉ. विजय आहेर- तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे. तुम्ही सभासदांच्या हिताचं काम करत आहात त्याबद्दल काही वाद नाही. फक्त हा वार्षिक सर्वसाधारण सभेचा अधिकार असताना हा अधिकार संचालक मंडळाला का हवा आहे एवढाच माझा प्रश्न आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- कारण संचालक मंडळ वेळोवेळी जेव्हा व्याजदर कमी करायचा असेल तेव्हा ते करू शकतील पण त्यांना जर अधिकार नसेल तर जेव्हा वार्षिक सर्वसाधारण होईल तेव्हा तो विषय सभेसमोर जाईल त्यानंतरच ते निर्णय घेऊ शकतात.

डॉ.विजय आहेर- गावंडे साहेब ठीक आहे. सध्या व्याजदर कमी आहे तोपर्यंत ठीक आहे. पण जेव्हा व्याजदर वाढायला लागतील तेव्हा पुन्हा वार्षिक सर्वसाधारण सभेकडे यावं लागेल तसं होऊ शकतं का.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर-  नाही तसं होणार नाही. पूर्ण आर्थिक ताळेबंद त्याची रूपरेषा बघूनच व्याजदर ठरवला जाईल.

डॉ.विजय आहेर- कदाचित संचालक मंडळाने बऱ्यापैकी विचार केला असेल या बाबतीत त्याबद्दल दुमत नाही पण जर वार्षिक सर्वसाधारण सभेला अधिकार असेल तर तो वार्षिक सर्वसाधारण सभेला असू द्यावा असं मला वाटतं ही माझी सूचना आहे.

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- याबद्दल एक सांगायचं तर ऑर्डीनरी लोन व्याजदर संचालक मंडळाला कमी करायचा होता परंतु आम्ही तो व्याजदर कमी करू शकलो नाही. आम्ही आता बायलॉज मध्ये अमेंडमेंट आणली आहे आता आम्हाला व्याजदर कमी करणे शक्य होईल. आम्ही फिक्स ठेवलं तर आम्हाला अडकून बसावे लागेल आणि दुसरी गोष्ट जी काही टर्म टू टर्मसहा महिन्यांनी वर्षांनी एकदम 9%, 8% वर असं नाही. स्पेशल लोन मध्ये 12% वरून 9.5% वर आलो ते कशामुळे शक्य झालं तर संचालक मंडळाला अधिकार होते म्हणून. जर अधिकार नसते तर शक्य झाले नसते. हा संचालक मंडळाला अधिकार आहे व्याजदर ठरविण्याचाआणि आर्थिक परिस्थिती बघूनच संचालक मंडळ ठरवत असते. पण नियमानुसार अमेंडमेंट आणलेली आहे.

डॉ.विजय आहेर- नियमानुसार असेल तर माझी काही हरकत नाही.

संस्थेचे चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- धन्यवाद.

**ठराव क्र.7.9: ठराव पास करण्यात आला की, दि.27.03.2021 रोजीच्या ऑनलाईन सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 (6) मुदतकर्जाचा व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीकडे राहील व तो 66 समान हप्त्यात सरासरी व्याजदर आकारणी करुन पगारातून कपात केला जाईल. आकस्मित कर्जाचा व्याजदर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीस असेल व तो 24 समान हप्त्यात सरासरी व्याजदर आकारणी करुन पगारातून कपात केला जाईल.**

**सुचक श्री भरत चौधरी**
**अनुमोदक श्री अविनाश रहाळकर**
**ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- विषय क्रमांक 8 वाचून दाखवला.

**विषय क्रमांक 8 अधिमंडळाच्या 59व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

**ठराव क्रमांक 8: ठराव पास करण्यात आला कि जे सभासद अपरिहार्य कारणास्तव बाहेर गावी गेले आहेत, ज्या सभासदांना ONLINEरजिस्ट्रेशन करता आले नाही अशा सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करून त्यांची उपस्थिती ग्राह्य करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**सूचक : श्री भरत चौधरी**

**अनुमोदक : श्री रहाळकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला**

संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे- विषय क्रमांक 9 वाचून दाखवला.

**विषय क्रमांक 9 माननीय अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.**

याबाबतीत आपल्याला जी पत्र सभासदांकडून आली होती त्यांची लेखी उत्तरे सर्वांना देण्यात आलेली आहेत. ई-मेल द्वारे ही उत्तरे देण्यात आलेली आहेत. ज्यांचे ई-मेल ॲड्रेस नव्हते त्यांची उत्तरं तयार आहेत त्यांची त्यांना पोच दिली जाईल.

**संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर-** आपल्या इथे सभेचे सर्व विषय संपले आहेत आणि या संस्थेकडून असं दाखवण्यात आल आहे की तुमची जी लिंक आहे ती डीॲक्टिव्ह होऊ शकते. तर आपल्याला दिलेला जो टाईम स्लॉट आहे तो संपत आहे. मला वाटतं सर्व आजी माजी सभासदांनी आणि आजी माजी कार्यकारी संचालक, आत्ताचे संचालक यांनी या सभेला जे काही सहकार्य केलं, ॲक्टिव्ह सभासद ज्यांना या सहकार क्षेत्राची माहिती आहे त्यांचेही मार्गदर्शन या सभेला लाभलेले आहे तरी या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. आणि मी या ठिकाणी सभा संपल्याचे जाहीर करीत आहे. आपण राष्ट्रगीतासाठी उभे राहूया. धन्यवाद!